नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक ३९ * * अकोला * शनिवार, दिनांक ९ ऑगस्ट २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## घुसखोर हे महाआघाडीची मतपेढी..

■ वृत्तसंस्था, सीतामढी, दि. ८ :
गृहमंत्री अमित शहा आणि नितीश कुमार यांनी शुक्रवारी सीतामढी येथील माता जानकी मंदिराचे भूमिपूजन केले. यावेळी त्यांच्यासोबत उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी देखील उपस्थित होते.
कार्यक्रमाला संबोधित करताना नितीश कुमार यांनी जुन्या सरकारवर निशाणा साधला. अमित शहा यांनी एसआयआर आणि ऑपरेशन सिंदूरवर भाष्य केले. अमित शहा यांनी एसआयआरवर लालू-राहुल यांना कोंडीत पकडले आणि म्हटले की, ज्यांचा जन्म भारतात झाला नाही, त्यांना मतदानाचा अधिकारही नाही. घुसखोर हे त्यांची व्होट बँक आहेत. म्हणूनच त्यांना (महागठबंधन) समस्या येत आहेत.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## वेडपट ट्रम्प

अमेरिकेतील एका वेडपट किंवा मूर्ख माणसाच्या निर्णयांमुळे सर्व जगात उलथापालथ होत आहे. डोनाल्ड ट्रम्प नावाच्या एका बिनडोक प्राण्यामुळे केवळ भारतच नाही तर सर्व जग आणि जगातील सर्वजण चिंतातूर झालेले आहे. परवा या माणसाने भारतावरील कर रक्कम पंचवीस टक्के वरून ५०% वर नेलेली आहे. इतका बिनडोक मसाला या जगात कितीही शोधले. तरी कुठेही सापडणार नाही, या आधीही सापडला नसता यापुढेही सापडणार नाही. ज्याला थोडेसे शास्त्र आणि अर्थशास्त्र कळते तो माणूस कधीच अशा मनमानी आणि तुघलकी घोषणा करत नाही. अमेरिकेसारख्या राष्ट्राच्या सर्वोच्चपदी बसलेला राष्ट्राध्यक्ष म्हणजेच हा थेरडा गल्लीतल्या गावगुंडा सारखा चाळे करीत आहे. यामुळेच आता भारतावर निश्चितच दोस्त दोस्त म्हणून सध्या या ट्रम्पाने आणि दोस्तीचे पाणी आपल्या लहरी पंपाने उपसून नको त्या ठिकाणी डम्प केले आहे. आपल्या भारतामध्ये तुघलक नावाचा एक बादशहा आला होता. त्यानेही काही वेडेपणाचे चाळे केले होते हे मान्य आहे. पण असे शंभर तुघलक मारून गोळा केले आणि त्यातून ठेचून जर अर्क काढला तर एक ट्रम्प तयार होतो. हे भाकीत तुम्ही नोंदवून ठेवा. या वेड्याला म्हणे नोबेल हवे आहे, याच्यासाठी नोबेल पारितोषक देणा?यांनी वेडेपणासाठीचे एक नोबेल पारितोषिक ठेवावे आणि त्याचा पहिला मान अजिबात अक्कल नसलेल्या या वेडपट ट्रम्पाला द्यावा. आम्ही परवाच याच्यावर लिहिले होते तेव्हा याचा वेडेपणा २५% होता. आता तो ५०% झाला आहे, त्यामध्ये जन्मजात ५० टक्के वेडेपणाची बेरीज केली म्हणजे तो ट्रम्पच असू शकेल. असे म्हणतात की शहाण्यांसाठी शब्दांचा मार असतो, वेड्यांना कशाला मारायचे ?

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# मते चोरून मोदी पंतप्रधान

### राहुल गांधींचा पुन्हा आरोप : निवडणूक आयोगाने इलेक्ट्रॉनिक डेटा दिल्यास ते सिद्ध करू

■ वृत्तसंस्था, बंगळुरू, दि. ८ :
काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी सांगितले की, नरेंद्र मोदी २५ जागांच्या फरकाने तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले आहेत. भाजपने ३५ हजार किंवा त्यापेक्षा कमी मतांनी जिंकलेल्या २५ जागा आहेत. जर आम्हाला इलेक्ट्रॉनिक डेटा मिळाला तर आम्ही सिद्ध करू की मोदी फसवणूक करून पंतप्रधान झाले आहेत.

कर्नाटकातील बंगळुरू येथील फ्रीडम पार्क येथे आयोजित काँग्रेसच्या 'मतदान रॅली'मध्ये राहुल गांधी यांनी हे वक्तव्य केले. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे देखील त्यांच्यासोबत या रॅलीत सामील झाले. राहुल म्हणाले, निवडणूक आयोगाने गेल्या १० वर्षांची संपूर्ण इलेक्ट्रॉनिक मतदार यादी आणि व्हिडिओग्राफी देशाला द्यावी. जर हे सर्व दिले नाही तर तो गुन्हा आहे. संपूर्ण देशाने निवडणूक आयोगाकडून मतदारांचा डेटा मागितला पाहिजे.



बंगळुरूला पोहोचण्यापूर्वी राहुल यांनी त्यांच्या पोस्टमध्ये लिहिले, 'मत चोरी' हा केवळ निवडणूक घोटाळा नाही तर संविधान आणि लोकशाहीचा मोठा विश्वासघात आहे. देशातील गुन्हेगारांनी ऐकावे, काळ बदलेल, त्यांना नक्कीच शिक्षा होईल.

तत्पूर्वी, राहुल यांनी गुरुवारी असा आरोप केला होता की कर्नाटकच्या महादेवपुरा विधानसभा मतदारसंघात १,००,२५० बनावट मते तयार करण्यात आली होती, ज्याचा फायदा भाजपला झाला. ही हेराफेरी भाजप-ईसीच्या संगनमतामुळे झाली, ज्यामुळे पंतप्रधान मोदी तिसऱ्यांदा सत्तेत आले.

राहुल गांधी म्हणाले की, कर्नाटकातील महादेवपुरा विधानसभा मतदारसंघात ६.५० लाख मते आहेत. त्यापैकी १ लाख २५० मते चोरीला गेली, म्हणजे त्यांनी ६ पैकी १ मत चोरले. चोरी ५ प्रकारे केली गेली. डुप्लिकेट मतदार म्हणजे एका मतदाराने अनेक वेळा मतदान केले. एका मतदाराने ५-६ मतदान केंद्रांवर मतदान केले. या लोकांचा पत्ताही नाही. अशी सुमारे ४० हजार मते असल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला.

#### सही करा अन्यथा देशाची माफी मागा !

निवडणूक आयोगाने काँग्रेस खासदार राहुल गांधी यांना सांगितले आहे की जर त्यांना मत चोरीचे त्यांचे दावे खरे वाटत असतील तर त्यांनी शपथपत्रावर स्वाक्षरी करावी. जर त्यांना त्यांच्या दाव्यांवर विश्वास नसेल तर त्यांनी देशाची माफी मागावी. सूत्रांच्या माहितीनुसार, जर राहुल यांना निवडणूक आयोगावरील त्यांचे आरोप खरे वाटत असतील तर त्यांना शपथपत्रावर स्वाक्षरी करण्यास कोणतीही अडचण येऊ नये. दरम्यान, कर्नाटकातील बंगळुरू येथील फ्रीडम पार्क येथे आयोजित 'मतदान हक्क रॅली' दरम्यान राहुल म्हणाले की निवडणूक आयोग मला शपथपत्र मागतो. ते म्हणतात की मला शपथ घ्यावी लागेल. मी संसदेत संविधानाची शपथ घेतली आहे. निवडणूक आयोगाकडून प्रतिज्ञापत्राचा मुद्दा समोर आल्यावर प्रियंका गांधी म्हणाल्या, राहुल गांधी यांनी मत चोरीबाबत मोठा खुलासा केला आहे, ज्याची चौकशी झाली पाहिजे. निवडणूक आयोग मतदार यादी देत नाही, या प्रकरणाची चौकशी करण्याऐवजी ते प्रतिज्ञापत्र मागत आहे. आम्ही सतत डेटा दाखवत आहोत, पण निवडणूक आयोग ते स्वीकारण्यास तयार नाही.

## मोदींची पुतिन यांच्याशी फोनवर दीर्घ चर्चा



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ८ :
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी फोनवर चर्चा केली. ट्रम्प यांच्यावरील टॅरिफ वादाच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान मोदी आणि पुतिन यांनी भारत-रशिया संबंध मजबूत करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला.

पंतप्रधान मोदींनी एक्स वर लिहिले - अध्यक्ष पुतिन यांच्याशी माझी खूप चांगली आणि सविस्तर चर्चा झाली. परस्पर सहकार्य वाढवण्यासाठी आणि भारत-रशिया धोरणात्मक भागीदारी आणखी दृढ करण्यासाठी आम्ही आमची वचनबद्धता पुन्हा व्यक्त केली. या वर्षाच्या अखेरीस राष्ट्रपती पुतिन यांच्या भारत भेटीची मी उत्सुकतेने वाट पाहत आहे.

एक दिवस आधी, भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी गुरुवारी मॉस्को भेटीदरम्यान क्रेमलिन येथे रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची भेट घेतली.

## शोरुमची इमारत कोसळली

## तीन ठार, तिघे गंभीर

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. ८ :
आरमोरी येथील हिरो कंपनीच्या शोरुमची इमारत कोसळल्याने मलब्याखाली दबून तीन जण जागीच ठार, तर तिघे गंभीर जखमी झाले. ही घटना शुक्रवारी संध्याकाळी घडली. आकाश ज्ञानेश्वर बुराडे (२५), रा. निलज, ता. ब्रम्हपुरी, तहसीन इस्त्राईल शेख (३०) व अफसान शेख (३२), दोघेही रा. देसाईगंज अशी मृतांची नावे आहेत.



या दुर्घटनेत सौरभ चौधरी (२५), रा. मेंडकी, विलास मने (५०) व दीपक मेश्राम (२३), दोघेही रा. आरमोरी व आणखी एक जण गंभीर जखमी झाला आहे. आरमोरी येथे भगतसिंह वॉर्डात जुन्या इमारतीत लालानी यांचे शोरुम आहे. ही इमारत धोकादायक असतानाही तेथे शोरुम सुरू होते. शुक्रवारी इमारतीचा मागचा भाग कोसळला. यात तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर तिघे गंभीर जखमी असून गडचिरोली जिल्हा सामान्य रुग्णालयात भरती करण्यात आले आहे.

## अमेरिकेकडून शस्त्रे-विमाने खरेदी करणार नाही भारत

### संरक्षणमंत्र्यांनी रद्द केला वॉशिंग्टन दौरा

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ८ :
टॅरिफ वादाच्या पार्श्वभूमीवर, भारताने अमेरिकेकडून शस्त्रे आणि विमाने खरेदी न करण्याचा निर्णय घेतला आहे. वृत्तसंस्था रॉयटर्सने दोन अधिकाऱ्यांच्या हवाल्याने सांगितले की, भारताने नवीन अमेरिकन शस्त्रे आणि विमाने खरेदी करण्याची योजना थांबवली आहे. हा संरक्षण करार सुमारे ३१,५०० कोटी रुपयांचा आहे.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह अमेरिकन शस्त्रे खरेदी करण्यासाठी वॉशिंग्टनला जाणार होते. परंतु त्यांचा दौरा रद्द करण्यात आला आहे. भारतीय नौदल ६ बोईंग पी८आय टोही विमाने आणि सपोर्ट सिस्टीम खरेदी करण्याची घोषणा करण्याची योजना आखत होते. प्रस्तावित ३.६ अब्ज डॉलर्सच्या करारात या विमानांच्या खरेदीवरील वाटाघाटी अंतिम टप्प्यात होत्या. मात्र, ट्रम्पने टॅरिफ वाढवल्याने भारताने आता अमेरिकेकडून शस्त्रास्त्र खरेदी न करण्याचा निर्णय घेतल्याचे समजते.

## शरद पवार दिल्लीहून थेट नागपुरात



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :
खासदार शरद पवार शुक्रवारी (८ ऑगस्ट) दोन दिवसांच्या नागपूर दौऱ्यावर आले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे शनिवारी (९ ऑगस्ट) मंडल यात्रा काढण्यात येणार असून तिचा शुभारंभ त्यांच्या पवार यांच्या हस्ते व्हेरायटी चौक, आशीर्वाद लॉन येथून होणार आहे.

विधानसभा निवडणुकीनंतर प्रथमच पवार यांचा हा नागपूर दौरा आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या दौऱ्याला महत्व आहे. ९ ऑगस्टला सकाळी ९ वाजता मंडल यात्रेला हिरवी झेंडी दाखवतील, असे राष्ट्रवादीचे नेते अनिल देशमुख यांनी सांगितले. विविध विकास कामे पूर्ण करून वर्ष दीड वर्ष झाले आहे. परंतु, अद्यापही कामचे देयक न मिळाल्याने राज्यातील कंत्राटदाराचे सुमारे ९० हजार कोटी रुपये देणे बाकी आहे. अनेक कंत्राटदार हे कर्जबाजारी झाले आहे, असा दावा देशमुख यांनी केला. पवार यांच्या दौऱ्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची रणनितीही ठरविली जाणार आहे.

## चालत्या बसवर कोसळले झाड



## ५ ठार

■ वृत्तसंस्था
बाराबंकी, दि. ८ :
उत्तर प्रदेशातील बाराबंकी येथे शुक्रवारी एका चालत्या रोडवेज बसवर झाड कोसळले. या अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला. अनेक प्रवासी अजूनही अडकले आहेत, त्यांना बाहेर काढण्यासाठी बचाव कार्य सुरू आहे.

६० जणांना घेऊन जाणारी बस बाराबंकीहून हैदरगढला जात होती. अपघात झाला तेव्हा मुसळधार पाऊस पडत होता. झाड इतके जड होते की बसचे छत कोसळले. स्थानिक प्रशासन आणि पोलिस घटनास्थळी पोहोचले आहेत. बस भरलेली होती. बरेच लोक उभे होते, मग ड्रायव्हरने एक शब्द उच्चारला आणि झाड कोसळले.

## विचार पुढे अन् लाचार मागे... आसन व्यवस्थेवरून शिंदेंची टीका

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :
इंडिया आघाडीच्या बैठकीत उद्धव ठाकरे यांची शेवटच्या रांगेत बसण्याची व्यवस्था केल्याच्या मुद्यावरून सत्ताधारी शिवसेनेचे सर्वेसर्वा तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव यांच्यावर शेलक्या शब्दांत टीका केली आहे. काँग्रेसने त्यांना (उद्धव ठाकरे) त्यांची जागा दाखवली आहे. काँग्रेस त्यांचा अपमान करत असेल आणि त्याचे ठाकरे यांना काही वाटत नसेल तर आपण त्यावर काय बोलणार? विचार पुढे असतात आणि लाचार मागे असतात असे लोकच म्हणतात, असे ते म्हणालेत.

राहुल यांनी महाराष्ट्रासह सर्वच निवडणुकांत झालेल्या मतचोरीच्या मुद्यावर एक सादरीकरण केले. यावेळी उद्धव ठाकरे, त्यांचे सुपुत्र आदित्य ठाकरे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार हे अगदी शेवटच्या रांगेत बसल्याचे दिसून आले. या मुद्यावरून भाजपसह शिवसेनेच्या नेत्यांनी ठाकरेंवर टीकेची झोड उठवली आहे. या पार्श्वभूमीवर शिंदे यांनी टीका केली आहे.

BAPURAO DESHMUKH COLLEGE OF ENGINEERING
SEVAGRAM
NAAC ACCREDITED

MBA DIRECT SECOND YEAR ADMISSION NOTIFICATION 2025-26

Applications are invited in prescribed form, from registered / eligible candidates for admission to MBA Direct Second Year (Lateral Entry) for Academic Year 2025-26

Eligibility : BE / B.Tech / BBA / BMS (4 Years)

Schedule of MBA Direct Second Year Admission Process 2025-26

1. Availability and Submission of duly filled Application Form : 08/08/2025 to 11/08/2025 10.00 AM to 5.00 PM
2. Display of Provisional Merit List : 12/08/2025 at 2.00 PM
3. Submission of Grievances and Objections if any : 12/08/2025 2.00 PM to 4.00 PM
4. Display of Final Merit List (FCML) : 12/08/2025 at 5.00 PM
5. Admission as per Final College Merit List : 13/08/2025 to 14/08/2025 10.00 AM to 5.00 PM

Note : 1) Admission to MBA Direct Second Year shall be filled in as per State CET Cell Maharashtra State Norms. www.mahacet.org 2) Application form for admission is available at College Office and can also be downloaded from College Website.

Venue : Auditorium, BDCE Campus, Sevagram, Wardha

Address : Sevagram, Wardha - 442102, Maharashtra, India
CALL: 8412053014 / 7499074010 Website-www.bdce.edu.in
INSTITUTE CODE 4118


## मतदार याद्याच वेबसाइटवरून गायब

### आव्हाड यांचा गंभीर आरोप

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ८ :
महाराष्ट्र, कर्नाटक, बिहार या राज्यांच्या मतदार याद्या वेबसाइटवरून गायब झाल्या आहेत किंवा या वेबसाईट पर्यंत आता पोहोचताच येत नाही. असा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

मात्र आता चोरी सिद्ध झाली असल्याचा दावा देखील त्यांनी केला. चोराने कितीही लपवालपवी केली तरी आता काही फरक पडणार नाही, असे देखील त्यांनी म्हटले आहे.

या संदर्भात आमदार जितेंद्र आव्हाड यांनी एका सोशल मीडियाच्या पोस्टच्या माध्यमातून निवडणूक आयोगावर टीका केली आहे. चोर चोरीला लपवण्यासाठी धावपळ करत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. राहुल गांधी यांनी काल घेतलेल्या पत्रकार परिषदेनंतर लोकांची उत्सुकता वाढली आहे. त्यामुळे त्या याद्या वेबसाइटवरून गायब करून टाकल्या असल्याचे आव्हाड यांनी म्हटले आहे. चोराने चोरी केली आहे, हे आता पुराव्यानिशी सिद्ध केले असल्याचे देखील ते म्हणाले.



## मावळ तालुक्यातील आरोग्य संस्थांना आवश्यक सुविधा द्या : प्रकाश आबिटकर



**मुंबई :** मावळ तालुक्यातील नागरिकांना उत्कृष्ट आरोग्य सेवा प्रदान करण्याच्या दृष्टीने उपजिल्हा रुग्णालय वडगाव (कान्हे) व लोणावळा येथील आरोग्य संस्थांना आवश्यक सुविधा पुरविण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. या पार्श्वभूमीवर मंत्रालयात मंत्री श्री. आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील आरोग्यविषयक विकास कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. वडगाव (कान्हे) येथील उपजिल्हा रुग्णालयासाठी विविध योजनांवर चर्चा करण्यात आली. यामध्ये रुग्णालयाचे श्रेणीवर्धन, डायलिसिस केंद्र सुरू करण्यासाठी मंजुरी व पद निर्मिती, ट्रामा केअर सेंटरसाठी आवश्यक मनुष्यबळाची भरती, सिटी स्कॅन व एमआरआय सेवा सुरू करणे, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर व सर्जिकल साहित्य खरेदीसाठी निधी उपलब्ध करून देणे, तसेच स्वच्छता कर्मचारी व सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करणे यांचा समावेश होता.

# पायाभूत सुविधा विकास प्रकल्पांच्या पूर्णत्वासाठी पूर्व नियोजन महत्वाचे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ८ :

पूर्व नियोजन, कालमर्यादा, पारदर्शकता, गुणवत्ता आणि विविध विभागांच्या समन्वयाच्या माध्यमातून राज्यातील पायाभूत सुविधा विकास प्रकल्पांची गतीने उभारणी करून सर्व यंत्रणांनी एकत्रितरित्या एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट साध्य करावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी येथे आयोजित पायाभूत सुविधा विकास प्रकल्प प्रशिक्षणाचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी, मुख्य सचिव राजेशकुमार, प्रधान सचिव अश्विनी भिडे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्याच्या अर्थव्यवस्थेची वाटचाल एक ट्रिलियन डॉलरकडे सुरू आहे. ही वाटचाल अधिक गतीने होण्यासाठी राज्यात पायाभूत

### पायाभूत सुविधा विकास प्रकल्प कार्यशाळेचे उद्घाटन

सुविधा विकास प्रकल्प महत्वाचे आहेत. पूर्व नियोजनाच्या माध्यमातून असे प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासोबत त्यांची गुणवत्ता व उपयोगिता वाढते. राज्याने रस्ते, रेल्वे, पूल, भुयारी मार्गासह विविध अभियांत्रिकी प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केले आहेत. त्याचा समृद्ध अनुभव आपल्या गाठिशी आहे.

प्रकल्पांच्या उभारणीत गतिशक्ती, जिओ डेटासारख्या सुविधा उपलब्ध आहेत. शासनाच्या विविध विभागांकडे डेटा उपलब्ध आहे, त्याचा उपयोग करून घेण्यासाठी विभागांमध्ये समन्वय महत्वाचा आहे. त्याबरोबरच नियोजनासाठी क्षेत्रीय पाहणी आवश्यक आहे. असलेल्या माहितीचा योग्यवेळी उपयोग करून विकासप्रकल्पांना चांगली गती देता येते.

प्रकल्पांसाठी विकासक निवडताना त्याच्या क्षमतांचा विचार करणे गरजेचे आहे. प्रकल्पाचे करार करताना राज्याच्या हिताच्यादृष्टीने सूक्ष्म अभ्यासाद्वारे त्यात आवश्यक सर्वच बाबींचा समावेश करायला हवा.

भूसंपादनाअभावी प्रकल्पाची किंमत वाढू नये यासाठी भूसंपादन वेळेत पूर्ण होईल आणि त्याचा मोबदला वेळेवर अदा होईल याची दक्षता घ्यावी. भूसंपादन पूर्ण झाल्यावर प्रकल्पाची सुरूवात करावी, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## महाराष्ट्रात मतदार यादीत फेरफार सपा नेते अबू आझमी यांचाही दावा



**मुंबई :** समाजवादी पक्षाचे नेते आमदार अबू आझमी यांनी देखील भारतीय निवडणूक आयोगावर टीका केली आहे. सत्ताधारी भाजपप्रती आयोगाने उघड पक्षपातीपणा दाखवल्याचा आणि महाराष्ट्रातील मतदार यादीत फेरफार केल्याचा आरोप त्यांनी केला. पत्रकारांशी बोलताना, सपचे महाराष्ट्र प्रदेश प्रमुखांनी दावा केला की, गेल्या वर्षी निवडणुकीच्या सहा महिने आधी मानखुर्द-शिवाजी नगर विधानसभा मतदारसंघात अवैध मतदारांची नावे जोडण्यात आली होती. वैध मतदारांची नावे यादीतून वगळण्यात आली आणि त्या जागी अनिवासींची नावे त्या वेळी मतदार यादीत बदलण्यात आली. मतदार याद्यांचे तातडीने ऑडिट करण्याची आणि अधिक विसंगती टाळण्यासाठी जलद दुरुस्त्या करण्याची मागणी त्यांनी केली आहे. 2024 च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालाचा दाखला देत आझमी म्हणाले की, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आणि ज्येष्ठ बाळासाहेब थोरात यांच्यासह प्रमुख काँग्रेस नेत्यांचा पराभव हा चुकीच्या यादीचा पुरावा आहे. लोकांनी निवडणूक आयोगाच्या चुकीच्या कृत्यांविरुद्ध रस्त्यावर उतरून निषेध केला पाहिजे, असे आवाहन देखील आझमी यांनी केले.

# पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार

### कर्जमाफीसाठी समिती नियुक्त, अहवाल आल्यानंतर अंतिम निर्णय : चंद्रशेखर बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी
छत्रपती संभाजीनगर, दि. ८ :



राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा विषय लांबणीवर पडला नसून निवडणूक काळात भाजपाने कर्जमाफीचे आश्वासन दिले होते, ते पूर्ण करणार आणि गरजू व पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळेल, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकारांना सांगितले.

महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले, 'योग्य शेतकऱ्यांना कर्जमाफी' देण्यावर सरकार भर देत आहे. त्यासाठी एक समिती नेमण्यात आली आहे, ती शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करणार असून, त्या सर्वेक्षणानंतर गरजू आणि पात्र शेतकऱ्यांनाच कर्जमाफीचा लाभ मिळेल. कर्जमाफी ही 'मेरिट'वर झाली पाहिजे. ज्यांना खऱ्या अर्थाने मदत हवी आहे, अशा शेतकऱ्यांचा विचार केला जाईल. समाजातील सर्वात शेवटच्या घटकाला मदत करणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर कर्जमाफीबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल.

गुंठेवारीमध्ये अडकलेल्या घरमालकांना दिलासा देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे सांगत बावनकुळे म्हणाले, तुकडेबंदी कायद्यामुळे ज्या मिळकतींची नोंदणी होत नाही, अशा घरमालकांच्या समस्यांवर लक्ष दिले जात आहे. संभाजीनगर आयुक्तांना २०११ पूर्वीच्या गुंठेवारीतील बांधकामांची यादी तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जास्त आकारणी केली असल्यास ती कमी करून सर्वसामान्यांना दिलासा देण्याचा विचार असल्याचेही त्यांनी सांगितले.

महसूल विभागातील अनेक जागांवर झालेली अतिक्रमणे, वर्ग-२ जमिनी वर्ग-१ मध्ये रूपांतरित करणे आणि पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमणे काढणे यांसारख्या विषयांवर काम सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शैक्षणिक दाखल्यांसाठी लागणाऱ्या ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरची अट रद्द करण्यात आली आहे. घर बांधण्यासाठी लागणाऱ्या मुरमासाठी रॉयल्टी घेतली जाणार नाही. तसेच सिंधी समाजाला जागा मिळवून देण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दिल्ली भेटीबाबत बावनकुळे म्हणाले, एनडीएचे नेते म्हणून एकमेकांना भेटणे आवश्यक आहे. अनेक राजकीय गोष्टी असतात त्यासाठी समन्वय साधणे आवश्यक असल्याने या भेटी होतात. त्यामध्ये वेगळे काही नाही. त्याच पद्धतीने एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्याही भेटी होत असतात.

## बेघर निर्वासितांच्या न्यायासाठी 'जन आक्रोश महामोर्चा

■ महासागर प्रतिनिधी
छत्रपती संभाजीनगर, दि. ८ :

छत्रपती संभाजीनगर शहरात सुरू असलेल्या बुलडोझर कारवाई विरोधात आणि बेघर झालेल्या नागरिकांच्या न्याय हक्कांसाठी शुक्रवारी ८ ऑगस्ट रोजी 'सर्वपक्षीय जन आक्रोश महामोर्चा' आयोजित करण्यात आला.

क्रांती चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून दुपारी १ वाजता हा मोर्चा सुरू झाला. दुपारी ३ वाजता मोर्चा विभागीय आयुक्त कार्यालयावर पोहोचला. आयोजकांनी सांगितले की, "अतिक्रमण हटविण्याच्या नावाखाली प्रशासनाकडून कोणतेही पुनर्वसन न देता गोरगरीब, दलित, बहुजन, कामगार, अल्पसंख्याक व मागासवर्गीय नागरिकांना पावसाळ्याच्या तोंडावर बेघर केले जात आहे. यामुळे हे नागरिक अक्षरशः रस्त्यावर आले आहेत." हा मोर्चा कोणत्याही एकट्या संघटनेचा नव्हता. सर्व धर्मीय, सर्व पक्षीय, आंबेडकरवादी, संविधानवादी, समतावादी, मानवतावादी संघटना आणि आंबेडकरी चळवळीच्या पुढाकारातून याचे आयोजन करण्यात आले होते. मोचार्चा मार्ग क्रांती चौक, सिल्लेखाना, पैठण गेट, गुलमंडी, सिटी चौक, किल्ले अर्क, व्हिआयपी रोड मार्गे विभागीय आयुक्त कार्यालयापर्यंत होता. विभागीय आयुक्त कार्यालयासमोर मोचार्चे रूपांतर सभेत झाले. तेथे मनपा आणि लोकप्रतिनिधींविरुद्ध जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. या मोर्चात दिपक निकाळजे, अरविंद कांबळे, दिपक केदार, अमित वाहुळ, जयश्री शिरके, विष्णु जगताप, आनंद कस्तुरे, जयेश अभंग, मनोज जाधव, मिलिंद बनसोडे, विजय शिंगारे, वसंतराज वक्ते, बलराज दाभाडे, सिध्दोधन मोरे, नागेश केदारे, विजय बचके, सचिन जोगदंडे, संतोष चव्हाण, राजकुमार कांबळे आदी कार्यकर्ते व प्रतिनिधी सहभागी झाले.

## राज्यात मराठा-ओबीसी दंगल घडवण्याचा खटाटोप : मनोज जरांगे



**सातारा :** महाराष्ट्रात मराठा विरुद्ध ओबीसी अशी दंगल घडवण्याचा खटाटोप सुरू आहे. भविष्यात अशी एखादी दंगल घडली तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्याला सर्वस्वी जबाबदार असतील, असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी शुक्रवारी राज्य सरकारला दिला. जरांगे यांच्या या टीकेमुळे महाराष्ट्रात मराठा आरक्षणाचे राजकारण चांगलेच पेटण्याची चिन्हे आहेत. मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी 29 ऑगस्टला मुंबई चलोचा नारा दिला आहे. त्यानुसार जरांगे सध्या पश्चिम महाराष्ट्राचा दौरा करत आहेत. त्यांनी शुक्रवारी सातारा येथील फलटण येथे पत्रकारांशी संवाद साधताना राज्यात मराठा विरुद्ध ओबीसी दंगल घडवण्याचा खटाटोप सुरू असल्याचा आरोप केला. येत्या 29 ऑगस्ट रोजी आम्ही आरक्षणाचा तुकडा पाडणार आहोत. आम्ही ओबीसीतूनच आरक्षण घेणार हे निश्चित आहे. सरकार आरक्षण कसे देत नाही ते मी पाहतो. या प्रकरणी राज्यात मराठा विरुद्ध ओबीसींची दंगल घडवण्याचा खटाटोप सुरू होता.

## पुणे जिल्ह्यात ३ नवीन महापालिका होणार



■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ८ :

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी पुणे जिल्ह्यात तीन नवीन महापालिका स्थापन करण्याची घोषणा केली आहे. चाकण, हिंजवडी आणि उरळी देवाची-फुरसुंगी-मांजरी या औद्योगिक क्षेत्रांमध्ये स्वतंत्र महापालिका लवकरच स्थापन केल्या जाणार आहेत.

अजित पवार यांनी शुक्रवारी सकाळी चाकण औद्योगिक क्षेत्राचा पाहणी दौरा केला. त्यांनी तेथील विविध नागरी समस्यांची पाहणी करून अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. पवार म्हणाले की चाकण मध्ये नगर परिषद असूनही पायाभूत विकासावर

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा

मर्यादा येत आहेत. तसेच हिंजवडी तील औद्योगिक क्षेत्राच्या विकासालाही काही बंधने येत आहेत. या समस्या सोडवण्यासाठी या तिन्ही ठिकाणी स्वतंत्र महापालिका स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री असलेल्या अजित पवार यांनी शुक्रवारी पहाटेच भोसरीमध्ये कामाला सुरुवात केली. त्यांनी रात्री एक वाजता बीड जिल्हा दौरा आटपून पुण्यात दाखल झाल्यानंतर पहाटेच भोसरीतील कामांची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी चाकणमधील तळेगाव चौकात जाऊन तेथील वाहतूक कोंडीच्या समस्येची माहिती घेतली आणि संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. चाकण येथील औद्योगिक वसाहत आणि पुणे-नाशिक महामार्गावर सातत्याने वाहतूक कोंडी होत असते. औद्योगिक वसाहतीमुळे अवजड वाहनांची संख्या वाढली आहे.

## तरुणाची चाकूने भोसकून हत्या

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ८ :

चेंबूर परिसरातील तरुणीची छेड काढणाऱ्यांना रोखणाऱ्या तरुणाला बेदम मारहाण करून आरोपींनी हत्या केली. ही घटना बुधवारी घडली. याप्रकरणी टिळकनगर पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून तीन आरोपीना अटक केली असून यातील एक आरोपी अल्पवयीन असल्याची माहिती पोलिसांनी दिली. जय शिंदे (१८) असे मृत तरुणाचे नाव असून तो चेंबूरमधील सेल कॉलनी परिसरात राहत होता. याच परिसरात राहणाऱ्या एक तरुणीला आरोपी दीपेश भोसले आणि सुमित सोनवणे ३० जुलै रोजी छेडत होते.

## राज्यातील आरोग्य प्रयोगशाळा व रुग्णवाहिका सेवांचा आढावा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ८ :

आरोग्य भवन येथे राज्यातील आरोग्य प्रयोगशाळा, १०२ रुग्णवाहिका सेवा व आरोग्य विभागाच्या परिवहन सेवेचा सविस्तर आढावा सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी घेतला.

बैठकीत जलजन्य आजारांच्या पार्श्वभूमीवर, राज्यातील आरोग्य संस्थांच्या परिसरातील जलस्त्रोतांचे पाणी शुद्ध व सुरक्षित असल्याची खात्री करण्यासाठी ग्रामपंचायतींना रेड कार्ड व ग्रीन कार्ड देऊन जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच सर्व जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा आयपीएचएस मानकांनुसार सुसज्ज असाव्यात, आधुनिक उपकरणे व प्रशिक्षित कर्मचारी असावेत आणि परिसर स्वच्छ असावा, यावर भर देण्यात आला.

मंत्री आबिटकर यांनी खासगी रुग्णालयातील रुग्णांनी देखील सरकारी प्रयोगशाळेत तपासण्या कराव्यात, यासाठी प्रयोगशाळांचा दर्जा उंचावण्याचे निर्देश दिले. यामुळे शासनाला अतिरिक्त निधी मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

१०२ टोल फ्री रुग्णवाहिका सेवेसंदर्भात मंत्री आबिटकर यांनी सूचना देताना सांगितले की, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत वापरात असलेल्या रुग्णवाहिका केवळ महिला व बालकांसाठी न वापरता, आपत्कालीन वैद्यकीय परिस्थितीत इतर रुग्णांसाठीही वापरल्या जाव्यात. १०२ कॉल सेंटरचे योग्य प्रकारे मॉनिटरिंग करण्याचेही आदेश देण्यात आले. यावेळी राज्यातील आरोग्य यंत्रणेतील रिक्त पदांच्या भरतीची प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले. सर्व सूचना त्वरित अंमलात आणून आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम व लोकाभिमुख करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## राहुल गांधींनी 'मतचोरी'वर चांगले काम केले प्रकाश आंबेडकरांनी केले कौतुक



**मुंबई :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील कथित मतचोरीवरून निवडणूक आयोगाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. यावरून वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी त्यांचे कौतुक केले आहे. तसेच राहुल यांनी यापूर्वीच आमची साथ दिली असती, तर निवडणूक प्रक्रियेतील अनियमितता यापूर्वीच पुढे आली असती, असे ते म्हणालेत. प्रकाश आंबेडकर शुक्रवारी आपल्या एका ट्विटमध्ये म्हणाले की, राहुल गांधी तुमची कालची पत्रकार परिषद पाहिली. तुम्ही खूप चांगले काम केले. पण महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत सायंकाळी 6 वाजेनंतर 76 लाख गूढ मतांच्या विचित्र प्रकरणाचा उलगडा करण्यासाठी तुम्ही व तुमच्या काँग्रेस पक्षाने माझ्यासोबत व वंचित बहुजन आघाडीसोबत एकत्र काम करण्याचे माझे निमंत्रण स्वीकारले असते तर निवडणूक प्रक्रियेतील अनियमितता यापूर्वीच उजेडात आली असती. असे झाले असते तर कदाचित भविष्यात कोणत्याही निवडणुकीत अशी होण्याची शक्यता धुसर झाली असती. यात बिहारमधील आगामी विधानसभा निवडणुकीचाही समावेश आहे.

# खेळाडूंसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध कराव्यात

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :

खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी कामगिरी करता यावी यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देणे आणि त्यात सातत्य राखण्याचे निर्देश क्रीडा व युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे क्रीडा व युवक कल्याण विभागाचा पदभार घेतल्यानंतर क्रीडा मंत्री श्री. कोकाटे यांनी आढावा घेतला. यावेळी अपर मुख्य सचिव, अनिल डिग्गीकर,आयुक्त शीतल तेली-उगले, उपसचिव सुनील पांढरे, सहसंचालक सुधीर मोरे, उपसंचालक संजय सबनीस, उपसंचालक उदय जोशी, उपसंचालक माणिक पाटील, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे अवर सचिव अशोक दमय्यावार यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे म्हणाले की, शालेय स्तरावरच विविध क्रीडा स्पर्धेत भाग घेण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी पोषक वातावरण तयार करण्यात यावे. अद्ययावत क्रीडा सुविधा, प्रशिक्षक, स्पर्धांची संधी यांची पूर्तता करावी. खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच जे खेळाडू



### क्रीडा व युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे यांचे निर्देश


शासनाचे प्रतिनिधित्व करतात त्यांना विविध क्रीडा स्पर्धांतील यशानंतर बक्षीस प्राप्त करण्यास परवानगी देण्यासंदर्भात कार्यवाही करावी.

जास्तीत जास्त प्रशिक्षक निर्माण व्हावेत, जेणेकरून गुणवत्ताधारक खेळाडू वाढतील. प्रशिक्षकांसाठी नव्या योजना तयार कराव्यात. खेळाडूंना शासकीय नोकरीत असलेल्या आरक्षणासंदर्भात पारदर्शक प्रणाली राबविण्यासाठी समन्वयाने काम करावे, जेणेकरून खेळाडूंवर अन्याय होणार नाही. युवकांच्या कल्याण संदभार्तील योजना राबविण्याबाबत युवकांकडून जास्तीत जास्त सूचना मागवून त्यावर सकारात्मक विचार करावा असे निर्देशही त्यांनी दिले. राज्यात एकूण 162 क्रीडा संकुल पूर्ण असून, 138 क्रीडा संकुल प्रगतीपथावर आहेत. इतर ठिकाणी क्रीडा संकुल अद्ययावत सुविधांसह पूर्ण करण्याबाबत कार्यवाही सुरू असल्याची माहिती यावेळी सादरीकरणात देण्यात आली.

# पत्थर सारे बॉम्ब बनेंगे, नाव लगेंगी किनारे

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या १९४२ च्या क्रांती लढयातुन मिळाली स्वातंत्र्याची प्रेरणा..

भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात ९ ऑगस्ट १९४२ च्या क्रांतीलढ्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. हा निर्वाणीचा लढा महात्मा गांधी यांच्या नेतृत्वात करो या मरो व भारत छोडो' या नाऱ्यांमधून लढला गेला. प्रत्येकाच्या मनात स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित करण्याचे महान कार्य वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी केले. 9 ऑगस्ट हा दिवस क्रांतीदिन म्हणुन गुरुदेव सेवा मंडळाच्यावतीने साजरा होत आहे. हजारो लोकांना आपल्या प्रभावी भजन, कीर्तन आणि भाषणांतून राष्ट्रीयतेची जाणीव करून देणाऱ्या राष्ट्रसंतांनी १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामात अभूतपूर्व असा रंग भरला. बासरी सोडून द्या, बना सुदर्शनचक्रधारी' असा संदेश ते देत होते. अब काहेको धूम मचाते' या भजनातून इंग्रजांना इशारा देत महाराज म्हणाले, झाड झडुले शस्त्र बनेंगे, भक्त बनेंगी सेना, पत्थर सारे बॉम्ब बनेंगे, नाव लगेंगी किनारे. भजन, कीर्तनातून त्यांनी अमरावती जिल्ह्याती यावली शहीद ,आष्टी, चिमूर, नागपूर, चंद्रपूर या ठिकाणी सुरू केलेल्या स्वातंत्र्य लढ्याची मशागत केली अन् त्यातूनच स्वातंत्र्य लढ्याची भूमी तयार होत राहिली, यातूनच क्रांतिलढ्याला बळ मिळत गेले.



९ ऑगस्टला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे आष्टीला गांधी चौकात भजन झाले. भजनातून आरती मंडळांच्या कार्यकर्त्यांना स्फूर्तीदायक मार्गदर्शन करून पत्थर सारे बॉम्ब बनेंगे, भक्त बनेंगी सेना" हा संदेश प्रत्यक्षात उतरवण्याचा सल्ला त्यांनी दिला. १० ऑगस्टला तळेगाव (शा.पं.), खरांगणा (मोरांगणा) वर्धा आणि १२ ऑगस्टला हिंगणघाट येथे असा झंझावती भजन आणि भाषणांचा कार्यक्रम झाला. जिल्ह्यातील १९४२ च्या क्रांतीलढ्याचे रणशिंगच त्यांनी या माध्यमातून फुंकले गेले. १३ ऑगस्टला ते चिमुर येथे पोहचले. आष्टी आणि चिमूरला क्रांती घडली तो दिवस होता नागपंचमीचा १६ ऑगस्ट १९४२, आष्टी येथील पोलिस ठाण्यावर सत्याग्रह करण्याचा कार्यक्रम आधी १७ ऑगस्टला ठरला होता. परंतु, १६ ऑगस्टला आंदोलन तीव्र झाले.

गावकरी आणि ब्रिटिश शिपाई यांच्यात स्वातंत्र्य संग्राम घडून आला. जनतेमधील रोष बघून तात्कालिन निरीक्षकाने वाटाघाटीसाठी मोतीराम होले आणि पांडुरंग सव्वालाखेंना आत घेतले तर रामभाऊ लोहे जनतेला शांत करण्याचा प्रयत्न करीत होते. या दोघांना पोलिसांनी डांबले असे समजून आंदोलक खवळले. जमावातील काही लोकांनी पोलिस ठाण्याच्या मागच्या बाजूने जाऊन कागदपत्रे हस्तगत करण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलीस उपनिरीक्षकाने गोळीबार करण्याचा आदेश दिला. त्यात सहा जण शहीद झाले. त्यामुळे जनतेत तीव्र प्रक्षोभ निर्माण झाला आणि स्वातंत्र्य संग्रामात त्यांनी स्वतःला झोकून दिले. यात डॉ. गोविंद मालपे आष्टी, नबाब रसीद खॉं, पेठ, आष्टी, हरिलाल हिरालाल मारवाडी, खडकी, केशवराव श्रावणजी ढोंगे, वडाळा, पंची पोलसू गोंड, वडाळा आणि उदेभानजी डेमाजी कुबडे यांनी प्राणाहुती दिली.

चिमूर येथे १५ ऑगस्टला राष्ट्रीय सेवादलाच्या लहान मुलांनी काढलेली प्रभातफेरी पोलिसांनी अडवली. राष्ट्रसंतांनी हस्तक्षेप केल्याने पोलिसांनी काही केले नाही. दुसऱ्या दिवशी नागपंचमीला प्रभातफेरी काढण्यात आली. महाराजांना चंद्रपूरला चातुर्मास कार्यक्रमासाठी जायचे असल्याने ते निघाले तेव्हा आंदोलकांनी त्यांना मार्गदर्शन करण्याची विनंती केली. तेव्हा शांततेत सत्याग्रह करा, असे म्हणून महाराजांनी आपल्या गळ्यातील हार तोडून त्यातील फुलांचा जमावावर वर्षाव केला. जमावाने तो महाराजांचा सत्याग्रहासाठीचा प्रेरणाप्रसाद समजून उत्साहात येऊन डाक बंगल्याकडे मोठ्याने नारे लावत मोर्चा व ळवला. तिथे एसडीओ डुंगाजी आणि पालीस निरीक्षक जरासंग यांच्याकडे शांततेने कागदपत्रे सुपूर्द करण्याची मागणी केली. ती त्यांनी धुडकावून लावली. संतप्त जमावाने डुंगाजी आणि तहसीलदार सोनवणे यांना जागीच ठार केले. आंदोलकांनी सर्व बंदिस्त नेत्यांना मुक्त केले व सर्व कागदपत्रे जाळून टाकली. पोलिसांनी केलेल्यागोळीबारात काही जण शहीद तर अनेक जण जखमी झाले.

पोलिसांनी अनेक दिवस सशस्त्र पहारा लावून चिमूर व परिसरातील गावांवर एक लाख रुपयांचा सामूहिक दंड आकारला आणि तो बळजबरीने वसूलही करण्यात आला. विदर्भातील आष्टी-चिमूर-यावली यासह बेनोडा, वरुड, उत्तमगाव यासारखी गावंसुद्धा महाराजांपासून प्रेरणा घेऊन या स्वातंत्र्य समरात प्राणपणाने उतरली. त्यांनीही स्वातंत्र्य यज्ञात आपली आहुती टाकली आणि भारतीय इतिहासात अजरामर झाले.

# विध्वंसाचे दुसरे नाव धराली





धराली येथील रहिवासी आकाश पंवार फक्त ३२ वर्षांचे होते. ५ ऑगस्ट रोजी त्यांनी काही मित्रांना घरी बोलावले. आकाश यांची आई कामेश्वरी देवी आणि कुटुंबातील इतर सदस्य जवळच्या हर दुधा मेळ्याला गेले होते. धराली शहर डोंगराच्या पायथ्याशी वसलेले आहे. अचानक वरून पाण्यासोबत चिखल-गाळ वाहू लागला. आवाज ऐकून आकाशने त्याची स्कूटर सुरू केली. तो स्कूटर वळवत असतानाच चिखलाचा प्रचंड मोठा लोंढा त्याच्या घरापर्यंत पोहोचला. आकाशच्या डोक्यावर एक दगड लागला आणि तो तिथेच मरण पावला.

---------------

उत्तराखंडमधील धराली येथे भूस्खलनामुळे झालेल्या विध्वंसानंतर ५० हून अधिक बेपत्ता लोकांचा शोध सुरू आहे. तथापि, धरालीतील लोक सांगत आहेत की किमान १५० लोक ढिगाऱ्याखाली अडकले असण्याची शक्यता आहे. एकूण ५ जणांचा मृत्यू झाला आहे, त्यापैकी फक्त आकाशचा मृतदेह सापडला आहे. एसडीआरएफ, आयटीबीपी, पोलिस आणि प्रशासन बचावकार्यात गुंतले आहे. धरालीतील लोकांना माटली येथील आयटीबीपी कॅम्पमध्ये आणले जात आहे.

आकाश धराली येथे एक हॉटेल चालवत होते. त्यांची आई कामेश्वरी देवी आणि कुटुंबातील इतर सदस्य आयटीबीपी कॅम्पमध्ये आहेत. त्यांना येथे एअरलिफ्ट करण्यात आले. मुलाच्या मृत्यूपासून त्यांची तब्येत ठीक नाही. त्या बोलण्याच्या स्थितीत नाहीत.

कामेश्वरी देवींच्या परिसरात राहणाऱ्या रजनी कुक्रेती त्यांची काळजी घेत आहेत. रजनी यांनीही धराली उद्ध्वस्त होताना पाहिले आहे. तेव्हापासून त्या कामेश्वरी देवींसोबत आहेत. रजनी म्हणतात, 'आकाशसोबत काही मित्र आणि गावकरी होते. आतापर्यंत फक्त आकाशचा मृतदेह सापडला आहे. काही सेकंदांच्या विध्वंसाने धारालीतील सर्व काही उद्ध्वस्त झाले.' धरालीमध्ये अजूनही अनेक लोक गाळाखाली दबले आहेत. त्यांच्या जगण्याची आशा फार कमी आहे.

धराली हे साधारणतः १ हजार लोकवस्तीचे गाव. गंगोत्रीला जाणारा मार्ग येथूनच जातो. तीन दिवसांपूर्वीच्या ढगफुटीनंतर महाप्रलय आला आणि होत्याचे नव्हते झाले. संपूर्ण गाव पाणी आणि त्याबरोबर वाहून आलेल्या मलब्याखाली गाडले गेले. भगवान नामक इसमाचे ४० खोल्यांचे हॉटेल होतं. संपूर्ण इमारत उद्ध्वस्त झाली. दुसऱ्यांदा जेव्हा लोंढा आला तेव्हा त्यांची बाग वाहून गेली. काहीही शिल्लक राहिले नाही. येथील कुणालाही कधीच वाटलं नव्हतं की अशी आपत्ती येईल आणि एका मिनिटात त्यांचे मोठे गाव गाडले जाईल.'

या आपत्तीनंतर 'किमान १५० लोक बेपत्ता आहेत. ते आता वाचणार नाहीत. इतक्या चिखलात कोण वाचले असेल? असा प्रश्न गावकरी विचारत आहेत. गावकरी, व्यापारी, कामगार, कोणीही सापडले नाही. घरे, दुकाने, बाजारपेठा, मंदिरे, बागा, शाळा, सर्व काही गाडले गेले. महाप्रलयाचा व्हिडिओ बनवणाऱ्या व्यक्तीने सांगितले की त्याने त्याच्या समोर लोकांना मरताना पाहिले

धराली गावाच्या दुसऱ्या बाजूला, समोरच्या डोंगरावर मुखवा गाव आहे. धराली येथील भूस्खलनाचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. यामध्ये डोंगरावरून पाणीमिश्रित गाळ वाहताना दिसत आहे. त्यानंतर अचानक चिखल आणि दगडांचा लोंढा येतो. धराली येथील विध्वंसाची तीव्रता या व्हिडिओवरून दिसून येते. अपघाताच्या वेळी धरालीमध्ये उपस्थित असलेल्या एका व्यक्तीने हा व्हिडिओ बनवला आहे. यामध्ये धरालीचा संपूर्ण बाजार गाळाखाली गाडलेला दिसत आहे.

संयोगिता नामक एक महिला सांगते, 'संपूर्ण जगाने पाहिलेला व्हिडिओ माझ्या भावाने बनवला होता. आम्ही जोरात शिट्ट्या वाजवत होतो आणि लोकांना पळून जाण्यास सांगत होतो. सगळं खूप धोकादायक होतं. मी लोकांना मरताना पाहिले. कोणालाही काहीही करण्याची किंवा पळून जाण्याची संधी मिळाली नाही.'

ती सांगते, 'मी धरालीतील ८ जणांना ओळखत होते. मी कोणाशीही संपर्क साधू शकत नाही. गेल्या ५ दिवसांपासून वीज, मोबाईल नेटवर्क, इंटरनेट नाही. हर्षिल आणि धराली दरम्यानच्या हेलिपॅडमध्ये एक तलाव तयार झाला आहे. हा तलाव आमच्या घराच्या मागे तयार झाला आहे.'

उत्तरकाशी जिल्हा मुख्यालयापासून सुमारे ८ किमी अंतरावर असलेल्या माटली येथील आयटीबीपी कॅम्पला बचाव केंद्र बनवण्यात आले आहे. धारली आणि हर्षिल येथून लोकांना एअरलिफ्ट करून येथे आणले जात आहे. राज्य आणि केंद्रीय एजन्सी येथे तैनात आहेत. पोलिसांनी त्यांचे कॅम्प उभारले आहेत. आरोग्य विभागाने सुटका केलेल्या लोकांच्या तपासणी आणि उपचारांसाठी एक कॅम्पदेखील उभारला आहे. येथून, बचाव पथकाला लहान गटात धराली येथे पाठवले जात आहे.

ज्या लोकांना वाचवून आयटीबीपी कॅम्पमध्ये आणले जात आहे त्यांची यादी तयार केली जात आहे. त्यांची संपूर्ण माहिती लिहून ठेवली जात आहे.

ज्यांचे कुटुंब धरालीमध्ये होते असे लोकही येथे पोहोचत आहेत. आता त्यांच्याबद्दल कोणतीही माहिती नाही. २६ वर्षीय नगमा देखील त्यांच्यामध्ये आहे. त्या उत्तरकाशीच्या रहिवासी आहेत. नगमा यांचे वडील इब्राहिम खान आणि भाऊ फिरोज खान रंगकामासाठी धरालीमध्ये होते. भूस्खलनाच्या एक तास आधी नगमा यांनी त्यांच्या वडिलांशी बोलणे केले होते. तेव्हापासून त्यांचा फोन संपर्कात आलेला नाही.

विमानाने बाहेर काढण्यात आलेल्या लोकांमध्ये गंगोत्री धामच्या यात्रेवर गेलेले आणि धारालीच्या पलीकडे अडकलेले लोक होते. धरालीच्या आपत्तीनंतर, या सर्व लोकांना धरालीच्या आधी भीमताल येथे थांबवण्यात आले. भूस्खलनानंतर, गंगोत्रीपर्यंत वीज आणि मोबाईल नेटवर्क नाही. हे सर्व प्रवासी कोणाशीही बोलू शकत नसल्याची चिंता करत होते.

महाराष्ट्रातील छत्रपती संभाजी नगर येथील १८ जणांचा एक गट चार धाम यात्रेला निघाला होता. ५ ऑगस्ट रोजी प्रथम यमुनोत्री आणि नंतर गंगोत्रीला भेट दिल्यानंतर, ते सर्वजण गंगोत्रीहून उत्तरकाशीमार्गे परतत होते. जेव्हा धराली येथे आपत्ती आली तेव्हा हा गट तिथून काही किलोमीटर अंतरावर होता.

या गटाचा भाग असलेले कृष्णा म्हणतात की, भूस्खलनामुळे टॉवर कोसळले आणि नेटवर्क तुटले. मोबाईल नेटवर्क पूर्ववत झाल्यानंतर आम्ही घरी कळवले की आम्ही सुरक्षित आहोत. भैरों व्हॅलीहून पायी हर्षिलला आलेले लोकही धारलीतून गेले. त्यांनी या ठिकाणाचे व्हिडिओ बनवले आहेत. व्हिडिओमध्ये सर्वत्र फक्त चिखल आणि दगड दिसत आहेत.

अडकलेल्या प्रवाशांना हर्षिल येथून वाचवले जात आहे. त्यांना माटली आणि उत्तरकाशी येथे विमानाने हलवले जात आहे. ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत धाराली आणि हर्षिल येथून ३०८ लोकांना आयटीबीपी कॅम्प आणि जॉलीग्रँट हेलिबेसमध्ये विमानाने हलविण्यात आले आहे. हेलिकॉप्टर व्यतिरिक्त, २ चिनूक हेलिकॉप्टरद्वारे लोकांना वाचवले जात आहे. बचाव पथकातील १५५ कर्मचाऱ्यांना धराली येथे पाठवण्यात आले आहे. एकूणच धराली आणि हर्षिलचा विध्वंस अत्याधिक भयावह असा होता. जवान रात्रंदिवस मेहनत करून लोकांचा बचाव करताहेत.

■ ■ ■

# चले जाव घोषणांनी ब्रिटीशाही थरकापला




*आत्मक्लेश करणारी व्यक्ती क्रांतिकारक अशी व्यक्ती असते. क्रांतिकारक हा शब्द विशेषण म्हणून वापरला जाऊ शकतो; समाजावर किंवा मानवाच्या काही पैलूंवर मोठा प्रभाव पडतो, कारण त्याला सर्वस्वी ठरविले जाते. क्रांतीकारी याचा अर्थ असा क्रांतिकारी आहे जो एखाद्या व्यवस्थेविरुद्ध बंड करतो किंवा अन्याय, हिंसा किंवा काहीतरी चुकीचे आणि अस्वीकार्य अशा निर्णयाविरुद्ध बंड करतो. क्रांतीकारी ही अशी व्यक्ती आहे जी एकतर विद्रोह करते किंवा सद्य परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी त्याचे समर्थन करते.*

---------------

या ऐतिहासिक चले जाव आंदोलनात ८ ऑगस्ट रोजी गोवालिया टँक मैदानावर वंदे मातरम् हे प्रेरणादायी, वंदनीय गीत संपूर्ण कडव्यांसहीत संगीतकलानिधी मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर उर्फ मास्तर कृष्णराव यांनी झिंझोटी रागात तयार केलेल्या स्वकृत चालीत गाऊन सादर केले.

यावेळी पेटून उठलेल्या भव्य जनसमुदायासमोर हे तेजस्वी गीत गाण्यासाठी प्रसिद्ध गायक व कट्टर देशभक्त असलेल्या मास्तर कृष्णरावांचीच निवड करण्यात आली होती. या गीतावर इंग्रजांनी बंदी घातलेली असताना स्वतःच्या जीवाची पर्वा न करता या गीताचे संपूर्ण कडव्यांसहित जाहीर गायन करणे हे मोठे धाडस होते.

**प्रविण बागडे**
**नागपूर.**
**9923620919**

या आंदोलनात जनता मोठ्या प्रमाणावर सहभागी झाली. देशभरात ९ लाख लोकांनी स्वतःला अटक करवून घेतली. दुस?या महायुद्धानंतर १९४५ मध्ये इंग्लंड सत्ता बदल होऊन मेजर क्लमेंट ॲटली यांच्या नेतृत्वाखाली त्रिमंत्री योजना सुरुवातीपासून भारताला स्वातंत्र्य देण्याबाबत अनुकूल होती. मार्च १९४७ मध्ये पार्लमेंटमध्ये बोलतांना मेजर क्लमेंट ॲटली याने भारताविषयी धोरण स्पष्ट केले.

इंग्लंड लवकरच भारताला स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न करेल व त्यासंबंधी वाटाघाटी करण्याकरिता भारतात त्रिमंत्री कमिशन पाठविण्यात येईल अशी घोषणा करण्यात आली होती. मेजर ॲटली यांच्या घोषणेनुसार २४ मार्च १९४७ रोजी त्रिमंत्री कमिशन भारतात आले. स्ट्रॅफर्ड क्रिप्स, लॉर्ड पेथिक लॉरेन्स व अलेक्झांडर हे तीन सभासद होते. या त्रिमंत्री कमिशनने राष्ट्रीय काँग्रेसची स्वातंत्र्याची मागणी करून एक योजना मांडली, ही योजना म्हणेजच त्रिमंत्री योजना होय.

भारत छोडो आंदोलन किंवा ऑगस्ट क्रांती हे ऑगस्ट १९४२ मध्ये संपूर्ण स्वराज्यासाठी सुरू झालेले नागरी असहकार आंदोलन चले जाव चळवळ होते. गांधीजींच्या करा किंवा मरा ह्या संदेशाने या आंदोलनाची सुरुवात झाली होती. मुंबई येथे ८ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधींनी भारत छोडोचा नारा देऊन ब्रिटीशांविरोधात स्वातंत्र प्राप्तीसाठी आंदोलन उभारले होते. महात्मा गांधींजीसह कॉंगेस श्रेष्टींना ९ ऑगस्ट १९४२ रोजी भारत छोडो आंदोलनाचा एक भाग म्हणून अटक करण्यात आली होती.

या आंदोलनाचा गुप्त मसुदा सेवाग्राम येथे ९ जुलै रोजी बापुकुटीतील आदी निवासात तयार करण्यात आला होता आणि १५ जुलै रोजी काँग्रेस कार्य समितीतर्फे त्याला अंतिम स्वरूप देण्यात आले होते.

त्या मसुद्याला पुढे वर्धा ठराव म्हणून मान्यता देण्यात आली आणि ९ जुलै २०१८रोजी चले जाव चळवळीचा ७५ वा वर्धापन दिन संपन्न झाला. १९४२ साली याच तारखेला महात्मा गांधी यांनी ब्रिटीशांना चले जावचा आदेश दिला आणि त्या आदेशाने भारतातली जनता पेटून उठली.

तिने उत्स्फूर्तपणे गावागावात सरकारच्या विरोधात आंदोलन केले. ह्या आंदोलनाचे प्रतिसाद शहरी भागासह ग्रामीण भागातही पसरले. तत्कालीन ग्रामीण भागातील अग्रनी कार्यकर्ते असणारे बुलडाणा जिल्ह्यातील, नागझरी गावचे रखमाजी कायंदे (सावकार) यांनी शेकडो कार्यकर्ते आपल्या स्वखर्चाने मुंबईला आंदोलनात सहभागी केले होते.

सेवाग्राम येथे झालेल्या या मसुदा बैठकीत जनआंदोलनाचे नियम, आंदोलन पुढे नेण्याचे सर्व अधिकार महात्मा गांधींकडे देण्यात येत असल्याचे यावेळी ठरविण्यात आले होते.

त्यानंतर २४ मार्च १९४७ रोजी लॉर्ड माऊंटबॅटन भारतात आले. भारतात आल्याबरोबर निरनिराळ्या नेत्यांच्या भेटी घेऊन त्यांनी फाळणीची योजना तयार केली. ३ जून १९४७ रोजी ही योजना प्रसिद्ध करण्यात आली. मुस्लिम लीग व राष्ट्रीय काँग्रेसने या योजनेला मान्यता दिल्यानंतर १८ जुलै १९४७ रोजी ब्रिटिश पार्लमेंटने यांवर ठराव पास केला.

ब्रिटिश पार्लमेंटने पास केलेल्या भारतविषयीचा हा ठराव म्हणजे भारतीय स्वातंत्र्याचा कायदा होय. अशा रितीने स्वातंत्र्याच्या कायद्यातील तरतुदीनुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत हा स्वतंत्र झाला. भारताच्या इतिहासात ९ ऑगस्ट हा दिवस ऑगस्ट क्रांती दिन या नावाने साजरा केला जातो.

भारत छोडो आंदोलन ही भारताच्या स्वातंत्र्याच्या लढाईतील एक महत्त्वाची घटना आहे आणि दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी भारत छोडो आंदोलन दिन म्हणून पण साजरा केला जातो. हा दिवस १९४२ मध्ये महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने ब्रिटीश राजवटीच्या विरोधात जन आंदोलन सुरू केला होता. आजदिनी ८३ व्या ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त शुभेच्छा !

■ ■ ■

# सरकारने स्वतःचे हीत बाजूला ठेवून देशाच्या हितासाठी काम करावे



**ॲड. आकाश सपेलकर**
**वकील सर्वोच्च न्यायालय**

मोफत वीज 'रेवडी' वितरणामुळे राज्यांवर ९६ लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे. ही रक्कम भारताच्या वार्षिक राष्ट्रीय अर्थसंकल्पापेक्षा खूपच जास्त आहे. या कर्जावर १३ टक्के व्याज द्यावे लागेल.

'ग्लोबल साउथ' मधील कोणत्याही देशाची अशी अर्थव्यवस्था नाही. एक राष्ट्र म्हणून, भारतावर सुमारे २०० लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे. सरासरी नागरिकावर ४ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज आहे, परंतु इतके कर्ज का आहे हे देशाला कधीच स्पष्ट केले गेले नाही? तुम्हाला कर्ज का घ्यावे लागले?

भारत हा ४ ट्रिलियन डॉलर्सपेक्षा जास्त अर्थव्यवस्था असलेला आणि जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेला देश असताना ही परिस्थिती आहे. बिहारचे ताजे प्रकरण पाहता, ते ४ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्जात बुडाले आहे, तर त्याचे दरडोई उत्पन्न वार्षिक ७०,००० रुपयांपेक्षा कमी आहे. असे असूनही, मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी घरगुती ग्राहकांना १२५ युनिट मोफत वीज देण्याची घोषणा केली आहे. अर्थात, हे पूर्णपणे 'निवडणुकीचे गोडवे' आहे.

बिहारमध्ये, ऑगस्ट महिन्यात येणा?या घरगुती बिलांमध्ये, जुलैमध्ये १२५ युनिट वीज वापरणा?यांचे बिल 'शून्य' असेल. विचित्र विरोधाभास असा आहे की नितीश कुमार हे मोफत वीजेसारख्या 'निवडणूक मोफत देणग्या'चे कट्टर विरोधक आहेत. त्यांनी विधानसभेत आणि विधानसभेबाहेरही 'रेवड्यां'विरुद्ध जाहीर विधाने केली आहेत. पंतप्रधान मोदींनीही खुल्या व्यासपीठावर म्हटले आहे की 'मोफत मोफत' देशाची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त करू शकते, पण बिहारमध्ये काय झाले?

तिथे भाजपची सत्ता आहे. एवढेच नाही तर भाजप शासित राज्यांमध्ये - दिल्ली, हरियाणा, राजस्थान, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, मध्यप्रदेश, छत्तीसगड, ओडिशा आणि महाराष्ट्रातही 'मोफत वीज' दिली जात आहे. अर्थात, 'रेवाडीं'ची ही निवडणूक परंपरा अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीत २०० युनिट वीज मोफत वाटून सुरू केली होती. त्यांचा 'निवडणूक मोफत' पंजाबमध्येही खूप यशस्वी ठरला आणि आम आदमी पक्षाचे (आप) सरकार स्थापन झाले. त्यानंतर, 'आप' ने त्याला 'निवडणूक चमत्कार' बनवले.

हे पाहून भाजप आणि काँग्रेसनेही भरपूर 'रेवड्या' वाटल्या. काँग्रेसची तीन राज्य सरकारे मोफत वीज वाटप करत आहेत. त्या राज्यांवर लाखो कोटी रुपयांचे कर्ज आहे ही वेगळी बाब आहे.

तामिळनाडूमध्ये विरोधी पक्ष द्रमुकचे राज्य आहे आणि त्यांच्यावर ९ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज आहे, परंतु सरकार यंत्रमाग कामगारांना १००० युनिटपर्यंत मोफत वीज देत आहे. खरं तर, या सरकारांना आणि राजकीय पक्षांना देशाच्या अर्थव्यवस्थेची अजिबात काळजी नाही.

दिल्ली हे एक अर्ध-राज्य आहे, एक केंद्रशासित प्रदेश आहे. भारत सरकार आणि संसद देखील तिथे आहे. दिल्लीचे दरडोई उत्पन्न राष्ट्रीय सरासरीपेक्षाही चांगले आहे. दिल्ली महानगरातील रहिवाशांना कोणत्याही 'मोफत मोफत वस्तू'ची गरज नाही, परंतु ही युक्ती निवडणुका जिंकण्यासाठी देखील वापरली गेली आहे.

भाजपने दिल्लीत सरकार स्थापन केले आहे, म्हणून त्यांनी २०० युनिट मोफत वीज देण्याची आप सरकारची योजना सुरू ठेवली आहे. जेव्हा नितीश कुमार पहिल्यांदाच मुख्यमंत्री बनले आणि त्यांची सत्ता स्थिर झाली, तेव्हा त्यांनी महिलांच्या हितासाठी राज्यात दारूबंदी लागू केली. यामुळे तिजोरीचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होईल हे त्यांना माहीत होते, परंतु सामाजिकतेसाठी त्यांनी हे पाऊल उचलले. जरी दारूबंदी पूर्णपणे अयशस्वी झाली, तरी त्याचा राजकीय आणि निवडणूक परिणाम खोलवर झाला.

आता, वीज मंडळ आणि वीज वितरण कंपन्यांचे मोठे नुकसान असूनही, मुख्यमंत्र्यांनी मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला आहे आणि तोही जनतेला दिलासा आणि सुविधा देण्याच्या उद्देशाने करण्यात आला आहे. पंतप्रधान मोदींनी एकदा देशासमोर आर्थिक संकट आणि वीज मंडळांच्या तोट्याचा मुद्दा मांडला होता.

सरकारने राज्य वीज मंडळांना लाखो कोटी रुपयांचे 'जामीन पॅकेज' दिले आहेत, परंतु अजूनही किती कर्ज शिल्लक आहे हे देशासमोर आहे. बिहार सरकारने घरगुती ग्राहकांच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प बसवण्याची घोषणा केली आहे, परंतु त्यापूर्वी बिहारमधून गुन्हेगारी नष्ट केली पाहिजे.

जरा विचार करा, निवडणुका जिंकण्यासाठी, त्यांच्या संबंधित राज्य सरकारे महिलांसाठी रोख योजना, वीज बिल किंवा युनिट्सवर सूट इत्यादी धोरणे बनवून सरकारी तिजोरी लुटण्याचा विचार करतात आणि नवीन कर्जे घेत आहेत. केंद्र सरकारही आपल्या निवडणूक फायद्यासाठी अशा धोरणांचे समर्थन करते. हे लोकांच्या आणि देशाच्या भविष्यासाठी चांगले नाही. सरकारने स्वतःचे हित बाजूला ठेवून देशाच्या हितासाठी या प्रकरणाचा विचार केला पाहिजे.

■ ■ ■

# ९ ऑगस्ट क्रांती दिन

भारताच्या इतिहासात ' ९ ऑगस्ट क्रांती दिन ' हा सुवर्ण अक्षरांनी लिहिण्यासारखा प्रसंग आहे. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी गांधीजींनी सुरू केलेले इतिहासातील देशाला स्वातंत्र्य मिळवून देणारे हे शेवटचे आंदोलन आहे.

महात्मा गांधीजी यांनी ही चळवळ मुंबई येथून सुरू केली आणि संपूर्ण देशाला आव्हान केले. भारतीयांनो 'जागे व्हा' आता हे शेवटचे आंदोलन आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी भारतीयांना स्पष्टपणे गांधीजी म्हणाले. ' करा किंवा मरा ' अर्थातच 'करेंगे या मरेंगे '. खऱ्या अर्थाने हे आंदोलन ८ ऑगस्ट १९४२ च्या मध्यरात्रीपासून सुरु करून महात्मा गांधीजींनी मुंबईतून इंग्रजांना ठणकावून सांगितले.

**सौ. चैताली संगोपाल वरघट**
**मूर्तिजापूर, जि. अकोला.**
**9834583685**

भारत छोडो आंदोलनाचा नारा ब्रिटिशांच्या विरुद्ध स्वातंत्र चळवळीसाठी नारा देऊन आंदोलन उभारले. भारतीयांनो तुम्हाला जर इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त व्हायचे असेल तर प्राण देण्यास तयार व्हा. स्वातंत्र्यप्राप्ती हे शेवटचे आंदोलन असणार आहे. त्यामुळे संपूर्ण देश खडबडून जागा झाला. इंग्रजांच्या गुलामगिरीतून देश मुक्त करण्यासाठी ९ ऑगस्ट रोजी अनेक क्रांतीवीर यात सहभागी झाले. ९ ऑगस्ट क्रांतिवीरांच्या बलिदानाची गाथा आहे. म्हणूनच आपण ९ ऑगस्ट 'भारत छोडो आंदोलन' म्हणून भारतात साजरा करतो.

या दिवशी भारतीयांनी इंग्रजांच्या अत्याचाराविरुद्ध बंड पुकारले आणि स्वातंत्र्याच्या दिशेने निर्णायक पाऊल टाकले. हा दिवस आपल्याला आपल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या शौर्याचे आणि बलिदानाची आठवण करून देतो. क्रांती दिनाच्या दिवशी देशभरात हिंसाचार, आंदोलने आणि सत्याग्रहाच्या घटना घडल्या.

रेल्वे स्टेशन, सरकारी कार्यालय, पोस्ट ऑफिस यावर हल्ले झाले. ब्रिटिश सत्तेने आंदोलन दळपण्यासाठी बऱ्याच उपाययोजना केल्या. अनेक ठिकाणी लष्करी कारवाई करण्यात आली. हजारो लोकांना अटक करण्यात आली. अनेकांचा मृत्यू झाला. भारत छोडो आंदोलने भारतीय स्वातंत्र्य चळवळ येथे निर्णायक पर्व ठरले. या आंदोलनाने ब्रिटिश सत्तेवर जबरदस्त दबाव निर्माण झाला. दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटिश सत्ता आर्थिक दृष्ट्या आणि सैनिकी दृष्ट्या कमकुवत झाली होती.

भारतात होत असलेली आंदोलन आणि इतर घटना यामुळे अखेर ब्रिटिशांना भारताला स्वातंत्र देण्याचा निर्णय घ्यावा लागला. तसेच 'क्रांती दिन' हा स्वातंत्र्यानंतरही आपल्यासाठी महत्त्वाचा आहे. या दिवशी आपल्याला आपल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाची आठवण करून देतो. हा दिवस देशभक्तीची भावना जागवतो. आणि आपल्या जबाबदाऱ्या समाजाला देशाप्रती कोणत्या हे सांगतो.

स्वातंत्र्यानंतरच्या काळातही या दिवसाला साजरा करणे आपल्याला आपल्या इतिहासाची आणि संस्कृतीची जाणीव करून देते. क्रांती दिनाच्या दिवशी देशभर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. शाळा, महाविद्यालय, कार्यालय, सरकारी संस्थांमध्ये ध्वजवंदन केले जाते. विद्यार्थी आणि शिक्षक देशभक्तीपर गाणी, नृत्य यां माध्यमातून क्रांती दिवस साजरा करतात आणि संस्कृतीक कार्यक्रम सादर करतात.

या दिवशी देशभक्तीवर भाषण आणि चर्चा सत्र आयोजित केली जातात. यां दिवशी स्वातंत्र्य चळवळीतील घटकांचा आढावा घेतला जातो.

'क्रांती दिन' भारतीय स्वातंत्र चळवळीत एक महत्त्वपूर्ण दिवस असल्यामुळे, या दिवशी भारतीयांनी इंग्रजांच्या अत्याचारविरुद्ध बंड पुकारले आणि स्वतंत्र्याच्या दिशेने निर्णयाक पाऊल टाकल्यामुळे, हा दिवस आपल्या स्वातंत्र्यसैनिकांचे शौर्य आणि बलिदानाची आठवण करून देतो. या दिवशी आपण आपल्या देशाच्या प्रगतीसाठी सामाजिक न्यायासाठी आणि मानवतेच्या कल्याणासाठी एकत्रपणे कार्य करण्याचा संकल्प करावा.

या दिवशी क्रांतिवीरांना श्रद्धांजली देण्यात येते. देशातून इंग्रज राजवटीला नाश करतांना अनेक क्रांतिकारकांनी स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी दिलेल्या बलिदानाची आठवण आजच्या नव्या पिढीला माहीत असावी म्हणून सर्वांनी आपल्या हृदयात क्रांतीची मशाल पेटून क्रांतिवीरांना अभिवादन केले पाहिजे. हे या दिवसाचे महत्व आहे. भारत छोडो आंदोलनाची सुरुवात ऑगस्ट महिन्यात झाल्यामुळे याला ऑगस्ट चळवळ किंवा ऑगस्ट क्रांती असेही म्हणतात.

स्वातंत्र्यवीरांना श्रद्धांजली वाहून तसेच देशाच्या एकतेची भाषणे आणि इतर कार्यक्रमाद्वारे हा दिवस साजरा केला जातो. शेवटी इतकेच म्हणेल " देशभक्तांच्या बलिदानामुळे, स्वातंत्र्य झालो आपण, जे देशासाठी फासावर चढले, छातीवर ज्यांनी गोळ्या झेलल्या, देशाच्या प्रेमाखातर ज्यांनी संसाराची राख रांगोळी झाली, त्या शहिदांना करावे शतशत वंदन..!

■ ■ ■

## वाचक लिहितात

### भारताला आत्मनिर्भर करूया!


स्वदेशीच्या वापराने देश आत्मनिर्भर बनू शकतो हे वाटते तितके सोपे नाही पण प्रयत्न केले, तर अशक्यही नाही. गेल्या दहा-बारा वर्षात भारताने केलेली प्रगती, विकास पाहून तो लवकरच सर्व क्षेत्रात आत्मनिर्भर बनेल अशी खात्री किंवा शंका सर्व देशांना आहे. राक्षसी महत्वकांक्षा असलेल्या अमेरिका आणि चीन यांना ही प्रगती सहन होत नाही त्यामुळे भारतावर विविध प्रकारे दबाव आणून त्याच्या प्रगतीला खीळ घालण्याचे प्रयत्न या देशांकडून सातत्याने केले जात आहेत.

याचाच एक भाग म्हणून अमेरिकेने भारतावर पंचवीस टक्के आयात शुल्क व रशियाशी व्यापार करणे बंद करण्याचे सुतवाच केले आहे. भारतानेही प्रत्यूत्तरादाखल एफ 35 लढाऊ विमाने आयात सूचीतून वगळण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेची प्रगती आणि आरोग्य विभाग बहुतांशी भारतीयांवर अवलंबून आहे. उद्या भारतीयांना भारतातच त्यांच्या मनाप्रमाणे काम आणि वेतन मिळाले तर अमेरिकेची आरोग्य व्यवस्था कोलमडून जाईल.

भारताने निर्यात शुल्क वाढवल्यास अमेरिकेतील लोकांना अधिक दराने वस्तू खरेदी कराव्या लागतील आणि त्याचा फटका ट्रम्प यांना निवडणुकीत बसू शकतो. पूर्वीच्या काळी भारत स्वयंपूर्ण आणि प्रगत देश होता. त्यावेळी भारतात सोन्याचा धूर निघायचा अशाप्रकारचे दाखले इतिहासात सापडत्तात. आज पुन्हा एकदा भारताला स्वयंपूर्ण अर्थात आत्मनिर्भर बनवण्यासाठी प्रत्येकाने निर्धार करूया. त्यासाठी स्वदेशी वस्तूंना प्राधान्य देऊया.

■ **लीना मकरंद गाडगीळ**
**पनवेल.**

# निरोगी आरोग्यासाठी जवसाच्या बिया ठरतील फायदेशीर



संतुलित आहारात फक्त भाज्या आणि फळेच नसतात, तर आहारात काजू आणि बियांचाही समावेश केला पाहिजे. चिया बियाणे, जवस बियाणे, भोपळ्याच्या बिया, तीळ, सूर्यफूल बियाणे आणि सब्जा बियाणे इत्यादी अनेक प्रकारचे बिया असतात.

जवस बिया आरोग्यासाठी अनेक प्रकारे फायदेशीर आहेत. या बिया शरीराला प्रथिने, फायबर आणि जीवनसत्त्वे तसेच ओमेगा-३ फॅटी ॲसिड प्रदान करतात. लोक त्यांच्या आहारात जवस बियांचा समावेश करतात परंतु या बिया खाण्याची योग्य वेळ त्यांना माहिती नसते. अशा परिस्थितीत, जवसाच्या बिया नेमकं कोणत्या वेळी खाव्यात आणि त्यांचे सेवन करण्याची योग्य पद्धत जाणून घेऊयात.

तज्ज्ञांच्या मते, जवसाच्या बिया खाण्याची सर्वोत्तम वेळ सकाळची आहे. जवसाच्या बिया सकाळी खाव्यात कारण त्यामुळे आतड्यांचा दाह कमी होतो. परंतु, या बिया जसेच्या तसे खाण्याऐवजी, त्यांना बारीक करून खाणे अधिक फायदेशीर आहे. जवस खाल्ल्यामुळे तुमचं शरीर निरोगी राहाते. आजकाल व्यस्त जीवनशैलीमुळे तुमच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देता येत नाही. आरोग्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे अनेक गंभीर आजार होण्याची शक्यता असते.

**जवस खाण्याचे आरोग्यदायी फायदे**

जवसाच्या बिया खाल्ल्याने पचनक्रियेसाठी विशेष फायदा होतो. या बिया बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून मुक्तता मिळवतात. ज्यांना बद्धकोष्ठतेचा त्रास आहे त्यांनी विशेषतः फायबरने समृद्ध असलेल्या या जवसाच्या बियांचे सेवन करावे.

या बियाण्यांमुळे हृदयाच्या आरोग्यालाही फायदा होतो. जवसाच्या बिया वाईट कोलेस्ट्रॉल कमी करतात, ज्यामुळे हृदयाच्या समस्या दूर राहतात.अळशीच्या बिया हार्मोनल बॅलन्समध्ये उपयुक्त ठरतात. या बिया खाल्ल्याने मूड स्विंग कमी होतात. महिलांना या बिया खाल्ल्याने विशेषतः फायदा होतो.

जवसाच्या बिया हाडांच्या आरोग्यासाठी देखील फायदेशीर आहेत. मॅंगनीज आणि मॅग्नेशियम समृद्ध असलेल्या या बिया खाल्ल्याने हाडे मजबूत होण्यास मदत होते. वजन कमी करण्यासाठी जवसाचे बियाणे देखील खाल्ले जाऊ शकते. त्या खाल्ल्याने वारंवार भूक लागत नाही, ज्यामुळे जास्त अन्न सेवन कमी होते. जवसाच्या बियांमुळे त्वचा चमकदार आणि डागरहित दिसू लागते.

**या गोष्टी लक्षात ठेवा**

जास्त जवस खाल्ल्यास पोटदुखी, गॅस, आणि अतिसार होऊ शकतो., जवसामध्ये फायबरचे प्रमाण जास्त असल्याने, काही लोकांना बद्धकोष्ठतेचा त्रास होऊ शकतो., कधीकधी, जवसामुळे मळमळ आणि उलट्या देखील होऊ शकतात., काही लोकांना जवसाची ॲलर्जी असू शकते., ?लजीर्ची लक्षणे त्वचेवर पुरळ उठणे, खाज सुटणे, श्वास घेण्यास त्रास होणे आणि ?नाफिलेक्सिस यांचा समावेश असू

## अशोकायन



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

### राखी पोर्णिमेचा महिमा

पालकांनो रक्षा बंधन
केवळ ईव्हेंट म्हणून
करु नका साजरा

त्यामागील संदर्भ
भावी पिढीला द्या
समजाऊन जरा...

भाऊ बहीणीच्या
ऋणानुबंधनाचे नाते
रक्षाबंधनाचा क्षण
संवर्धित करते ..!

## ओडिशाचे अंकित आचार्य यांनी ३ दशलक्ष डॉलर्सच्या सीड फंडिंगसह कॉशियोच्या एआय मिलियन ४६ शहरांमध्ये केले सुरु!



**नागपुर, ८ ऑगस्ट :** भारतातील रस्ते जगातील सर्वात सुरक्षित बनवण्यासाठी काम करणाऱ्या एआय-संचालित व्हिडिओ टेलिमॅटिक्स स्टार्टअप कॉशियो ने अतिरिक्त १.८ दशलक्ष डॉलर्सचा निधी उभारला आहे. या फेरीचे नेतृत्व अमल पारिख यांनी केले होते, ज्यामध्ये ८आय व्हेंचर्स, एयू स्मॉल फायनान्स बँक, विभा चेतन (भागीदार - चेरवी व्हेंचर्स), व्हेंचर कॅटालिस्ट यांचा सहभाग होता. या फेरीला रवीन शास्त्री (संस्थापक भागीदार, मल्टीप्लाय व्हेंचर्स), विवेकानंद हालेकेरे (सह-संस्थापक-बाउन्स) आणि निश्चय एजी (सह-संस्थापक-जेएआर) यांचेही पाठबळ लाभले, ज्यामुळे कॉशियोची एकूण निधी उभारणी ३ दशलक्ष डॉलर्सपर्यंत वाढली. या वर्षी एप्रिलमध्ये, कंपनीने तिच्या चालू फेरीचा भाग म्हणून १.२ दशलक्ष डॉलर्सची उभारणी जाहीर केली होती.

भारताच्या रस्त्यांना आता भीतीची गरज नाही; त्यांना जबाबदारी आणि संरक्षणाची गरज आहे. कॉशियो मध्ये, आम्ही सुरक्षितता दृश्यमान आणि कृतीयोग्य बनवणारी तंत्रज्ञानाची निर्मिती करत आहोत. आम्ही पाठवलेला प्रत्येक इशारा अपघात रोखण्याची, कुटुंबाचे रक्षण करण्याची, जीव वाचवण्याची संधी आहे. म्हणूनच आम्ही येथे आहोत, कॉशियोचे सह-संस्थापक आणि सीईओ अंकित आचार्य म्हणाले. ही नवीन गुंतवणूक आम्हाला आमचे तंत्रज्ञान मजबूत करण्यास, आमचा संघ वाढविण्यास आणि आमच्या तैनाती फूटप्रिंटचा विस्तार करण्यास अनुमती देते जेणेकरून रस्ता सुरक्षा हा अपवाद नव्हे तर आदर्श बनेल. प्रांजल, कॉशियोचे सह-संस्थापक आणि सीटीओ पुढे म्हणाले. .

अमल पारीख म्हणाले: कॉशियोबद्दल मला जे प्रभावित केले ते सोपे आहे: संस्थापक जे समस्येला खोलवर समजून घेतात आणि मनापासून आणि मेहनतीने टीम बिल्डिंग करतात. अंकित, प्रांजल आणि त्यांची टीम भारतातील सर्वात तातडीच्या पण दुर्लक्षित आव्हानांपैकी एक - रस्ता सुरक्षा - याच्या मागे धावत आहेत. पायाभूत सुविधांशी एआय एकत्रित करून, ते एक व्यावहारिक पण नाविन्यपूर्ण दृष्टिकोन स्वीकारत आहेत. येथेच दलाल स्ट्रीटची शिस्त इनोव्हेशन स्ट्रीटच्या व्यत्ययाला तोंड देते. भारतीय रस्ते अधिक सुरक्षित बनवण्याच्या त्यांच्या मोहिमेत त्यांच्यासोबत भागीदारी करण्यास उत्सुक आहे.

## आयआयएममध्ये गौतम अदाणी यांची मॅनेजमेंट पाठशाळा




**लखनौ, ८ ऑगस्ट :** गुरुवारी आयआयएम लखनौमध्ये व्यवस्थापनाची एक आगळीवेगळी पाठशाळा पाहायला मिळाली. प्रसिद्ध उद्योगपती गौतम अदाणी यांनी त्यांच्या जीवनप्रवासातील शहाणपणाचे धडे मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांबरोबर शेअर केले. यावेळी भारतातील उद्योग क्षेत्राच्या संधी आणि विकासाबाबत त्यांनी आपले विचारही मांडले.

वेळेच्या वाळूत चालून इतिहास घडत नाही! गौतम अदाणी यांनी विद्यार्थ्यांबरोबर केवळ उद्योग नव्हे, तर आयुष्याचेही धडे शेअर केले. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, प्रत्येक गोष्ट आपल्या योजना प्रमाणे घडेलच असे नाही. अनेक वेळा निर्णय घेताना भीती वाटते, पण ती भीती पार केल्यावरच यश गवसते.

गौतम अदाणी म्हणाले : माझ्या प्रवासाने मला शिकवलं की भविष्य कधीही तितकं स्पष्ट नसतं जितकं ते वर्गखोलीत दिसतं. भविष्य गोंधळलेलं, अनिश्चित आणि अनेकदा कठोर असतं. आणि याचाच सामना करण्यासाठी तयार असणं गरजेचं आहे. मी शिकतोय आणि अजूनही शिकतोय की खऱ्या जगात असे क्षण येतात ज्यांची आधी कुठेही नोंद नसते. अशा क्षणी सर्व काही अंधुक होतं, व्यवसायाच्या संकल्पनाही निरुत्तर होतात. यश हे केवळ आपल्या अभ्यासावर नाही, तर त्या अनपेक्षित क्षणांना कसं हाताळतो यावर ठरतं.

ते पुढे म्हणाले की, भविष्य यावर ठरतं की तुम्ही स्वतःची गोष्ट 'केस स्टडी' बनवू शकता का. इतिहास हे फक्त विद्यमान मॉडेल्स वापरण्यावर नाही, तर नवीन मार्ग तयार करण्याच्या धैर्य व नेतृत्व क्षमतेवर घडतो. माझा ठाम विश्वास आहे की वेळेच्या वाळूत चालून इतिहास घडत नाही, इतिहास तेच घडवतात जे स्वतःचा मार्ग स्वतः तयार करतात.

## आप रो मत : कृष्णा श्रॉफच्या भावनिक संवादाने संपूर्ण भारताचे मन जिंकले!



**मुंबई, ८ ऑगस्ट :** झी टीव्हीवरील बहुप्रतिक्षित रिॲलिटी शो छोरियाँ चली गाँव सुरू होताच त्यातील सेलिब्रिटी स्पर्धकांची खरी कसोटी सुरू झाली आहे. कारण गावातील जीवनशैली ही शहरी आरामदायक आणि ग्लॅमरस जगण्यापेक्षा खूपच वेगळी आणि कठीण आहे. रणविजय सिंघाच्या सूत्रसंचालनाखाली सुरु झालेला हा शो, ११ प्रसिद्ध महिला सेलिब्रिटीजच्या गावातल्या संघर्षाची कहाणी सांगतो. यात अनिता हसानंदानी, ऐश्वर्या खरे, अंजुम फकीह, कृष्णा श्रॉफ, डॉली जावेद, एरिका पॅकार्ड, रमीत संधू, रेहा सुखेजा, सुमुखी सुरेश आणि जुळ्या बहिणी समृद्धी आणि सुरभी मेहरा (चिंकी-मिंकी) यांचा समावेश आहे. या सगळ्यांनी आपली सुखसुविधांनी भरलेली दिनचर्या मागे टाकून मध्य प्रदेशातील बमुलिया गावातील खरेखुरे, खडतर आणि साधे जीवन स्वीकारले आहे.

गावकऱ्यांनी स्पर्धकांचे आदरातिथ्य आणि प्रेमाने स्वागत केले असले तरी काहींसाठी गावात रुळण्याची खरी झुंज सुरू झाली आहे. आजच्या भागात, कृष्णा श्रॉफ एका अनपेक्षित अडचणीला सामोरी जाते ज्यामुळे ती खूप त्रस्त आणि भावुक करून होऊन जाते. तिची तब्येत ठीक नसल्यामुळे, विशेषतः पोट बिघडल्यामुळे, तिला घरकामात सहभागी होणे आणि गावाच्या दैनंदिन आयुष्यात पूर्णपणे रमणे कठीण जात आहे.

ज्या कुटुंबात कृष्णा श्रॉफ राहत आहे, त्या घरातील गोड स्वभावाच्या मावशींना कृष्णा अस्वस्थ आहे हे माहीत नव्हते. त्यामुळे जेव्हा त्यांच्या लक्षात आले की कृष्णा इतर मुलींप्रमाणे जेवत नाहीये, तेव्हा त्यांना फार वाईट वाटले. आधी, जेव्हा मावशींनी प्रेमाने घरी बनवलेली भुजिया शेव मुलींसाठी आणली, तेव्हा सुमुखी आणि समृद्धी आनंदाने खात होत्या. पण त्याच वेळी सुमुखीने हळूच सांगितले की कृष्णा ते खाणार नाही. हे ऐकताच मावशींना वाटले की त्यांनीच काही चूक केली असावी आणि त्या इतक्या भावुक झाल्या की ढसाढसा रडायलाच लागल्या.

ते पाहताच प्रेमळ कृष्णा श्रॉफने मावशींना लगेच मिठी मारली आणि त्यांना समजावून धीर देण्याचा प्रयत्न केला. ती म्हणाली, अरे आंटी, आप रो मत. मी इथे खूप आनंदात आहे. ती पुढे म्हणाली, त्या मावशी इतक्या निरागस आहेत की त्यांची चूक आहे असे मला वाटू द्यायचं नव्हते. मी त्यांना सांगितले की हे त्यांच्यामुळे नाहीये. माझे रूटीन खूप स्ट्रिक्ट आहे आणि जर मी त्यापासून थोडीही विचलित झाले, तर माझे डोके खूप खराब होते. जे खाणे मी खाते, ते खूप वेगळे असते. मला खरंच खूप वाईट वाटले की माझ्यामुळे त्यांच्या डोळ्यांत अश्रू आले.

आता आनंदाची बातमी ही आहे की कृष्णा श्रॉफला आता बरे वाटत आहे आणि लवकरच प्रेक्षकांना ती नव्या जोमाने गावातील कामांमध्ये सहभागी होताना पाहायला मिळणार आहे. ही खरीखुरी आणि भावनिक देवाणघेवाण दाखवून गेली की गावकरी आपल्या सेलिब्रिटी पाहुण्यांची किती मनापासून काळजी घेत आहेत, आणि शहरी जीवनात वाढलेल्या या स्पर्धकांना आता हळूहळू त्यांच्या कम्फर्ट झोनच्या बाहेरचे वास्तव जाणवू लागले आहे. पण ही तर फक्त सुरुवात आहे. पुढच्या भागांमध्ये अजून मोठ्या आव्हानांची झलक आणि त्याचबरोबर काही हृदयस्पर्शी नाती प्रेक्षकांच्या मनाला भिडण्यासाठी सज्ज आहेत... फक्त छोरियाँ चली गाँव मध्ये!

## स्वातंत्र्य दिनानिमित्त 'टाटा टी प्रीमियम देश की चायकडून 'देश का गर्व' मोहिमेची नवी आवृत्ती

**मुंबई, ८ ऑगस्ट :** टाटा कंझ्युमर प्रॉडक्ट्सचा प्रमुख चहा ब्रँड टाटा टी प्रीमियम आपल्या देश का गर्व मोहिमेच्या २०२५ आवृत्तीच्या माध्यमातून भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला मान देण्याची परंपरा यापुढेही सुरू ठेवत आहे. दरवर्षी स्वातंत्र्यदिन साजरा करताना टाटा टी प्रीमियमतर्फे चहाच्या दैनंदिन संस्कृतीला स्थानिक कलांशी जोडण्यात येते. त्यानुसार यंदाभारतातील प्रतिष्ठित कलाप्रकारांपासून प्रेरणा घेत तयार केलेल्या हस्तचित्रित किटलींच्या देश का गर्व संग्रहामार्फत हा उपक्रम राबवला जात आहे.

टाटा टी प्रीमियमने चहा संस्कृतीचा भाग असलेल्या वस्तूंमधून, मग तो साधा कुल्हड असो, चहाचा पारंपरिक कप असो किंवा यावर्षीची प्रातिनिधीक किटली, भारताची समृद्ध लोककला आणि प्रादेशिक कला सतत प्रकाशझोतात आणल्या आहेत. यातील प्रत्येक आवृत्ती केवळ सौंदर्यापुरती मर्यादित नसून, भारताच्या कलात्मक वारशाचे जतन, संवर्धन आणि पुढील पिढ्यांपर्यंत आधुनिकतेच्या आणि सार्थकतेच्या माध्यमातून पोहोचवणे हा खोल अर्थ असलेला उद्देश त्या मागे असतो. भारताच्या हस्तकलेचे सौंदर्य सगळे जग नव्याने शोधू लागले असताना, टाटा टी प्रीमियम देश की चायहा ब्रँड मात्र हे सौंदर्य आपल्या दैनंदिन जीवनात पूर्वीपासूनच साजरे करत आला आहे.यावर्षीभारतीय लोककलेच्या संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या 'कौशलम' संस्थेच्या सहयोगाने 'देश का गर्व' संग्रहात प्रादेशिक कलाप्रकारांपासून प्रेरणा घेतलेल्या हस्तचित्रित किटल्या सादर करण्यात आल्या आहेत.

## कौशल्य, आरोग्य आणि शाश्वत शेतीद्वारे अंबुजा सिमेंट्स ग्रामीण महाराष्ट्रात बदल घडवून आणते आहे



**चंद्रपूर, ८ ऑगस्ट :** वैविध्यपूर्ण अदानी पोर्टफोलिओमधील सिमेंट आणि बांधकाम साहित्य कंपनी अंबुजा सिमेंट्स कौशल्य विकास, आरोग्याबद्दल जागरूकता आणि शाश्वत शेतीद्वारे चंद्रपूर तसेच नागपूर जिल्ह्यांच्या साहाय्याने ग्रामीण महाराष्ट्रात बहुआयामी प्रभाव निर्माण करत आहे.


लखमापूर गावातील पूजा घोडके हिने अंबुजा सिमेंट्सच्या मदतीने जनरल ड्यूटी असिस्टंट कोर्स पूर्ण केला. आता ती मुंबईत केअर गिव्हर म्हणून काम करत महिन्याला २५,००० कमावते. करिअर-संबंधित कौशल्याच्या साहाय्याने तरुण ग्रामीण महिलांचे जीवन कसे बदलून जाते हेच पूजाचे यश सांगते. गडचांदूरमधील फराना शेखने एमएमएडब्ल्यू वेल्डिंगचे प्रशिक्षण घेतले आणि आता ती एक स्वयंरोजगार स्टील फॅब्रिकेटर आहे जी दरमहा १५,००० कमवते. एखाद्यावर अवलंबून असणे ते आर्थिक स्वातंत्र्यापर्यंतचा तिचा हा प्रवास म्हणजे व्यावहारिक प्रशिक्षण ग्रामीण उद्योजकतेला कसे प्रोत्साहन देऊ शकते याचेच उदाहरण आहे.

चंद्रपूरच्या ५२ गावांमध्ये राबवण्यात आलेली स्तन कर्करोगाबद्दल जागरूकता आणि तपासणी मोहीम ७,४०० हून अधिक महिलांपर्यंत पोहोचली. सुरुवातीच्या हस्तक्षेपामुळे १९ वर्षीय सोनाली भोसले हिला ३०,००० रुपयांची शस्त्रक्रिया करण्यापासून वाचवण्यात आले. ग्रामीण आरोग्य तसेच आर्थिक संरक्षणासाठी या कार्यक्रमाचा परिणाम समोर आला.

नागपूरमधील खंडाळा गावातील (अंबुजा सिमेंट्स कोळसा खाण ब्लॉक), उमेश चंद्रवंशी यांनी १.२५ एकर जमिनीवर वांगी लागवड करण्यासाठी ठिबक सिंचन आणि सेंद्रिय शेती पद्धतींचा अवलंब केला आणि त्यांना १.२६ लाखांचा फायदा झाला. चंद्रवंशी यांचे हे यश शेजारच्या शेतकऱ्यांना आधुनिक शेती स्वीकारण्यास प्रोत्साहन देते.

कौशल्ये, आरोग्य सुविधांची उपलब्धता तसेच शाश्वत उपजीविका सक्षम करून अंबुजा सिमेंट्स या अनोख्या उपक्रमांद्वारे स्वावलंबी, भविष्यासाठी तयार ग्रामीण समाजाची निर्मिती करत त्यांच्या जीवनात चांगले बदल करत आहे.

## विविध नव्या उपक्रमांसह पीआयबीएमचा विस्तार



**पुणे, ८ ऑगस्ट :** पुणे इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट (पीआयबीएम) ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे चेअरमन, रमण प्रीत यांनी पुण्यात नुकत्याच पार पडलेल्या अनौपचारिक पत्रकार संवाद परिषदेत बोलताना एव्हिएशन मॅनेजमेंट आणि एव्हिएशन इंजिनीअरिंग, तसेच सेमीकंडक्टर डिझाइन या अत्याधुनिक अभ्यासक्रमांचा समावेश असलेले अभ्यासक्रम लवकरात लवकर सुरू करणार असल्याची घोषणाही केली.

आपल्या संस्थेच्या भविष्यातील महत्त्वाकांक्षी योजना जाहीर करताना त्यांनी उद्योगाशी सुसंगत व्यावसायिक अभ्यासक्रमांची आवश्यकता यावेळी अधोरेखित केली.यावेळी बोलताना प्रीत यांनी व्यावसायिक व्यवस्थापन पदवी अभ्यासक्रम हे रोजगारभिमुख असावेत, बाजारातील नव्याने विकसित होत असलेल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी आणि डिजिटल साक्षरतेला प्रोत्साहन देणारे शिक्षण असावे यासाठी पीआयबीएम करत असलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला.

संस्थेची प्रगती दर्शवताना, प्रीत यांनी चंदीगड आणि दुबई येथे कॅम्पससह पाच नवीन कॅम्पस उघडण्याची त्यांची योजना प्रत्यक्षात आली असल्याचे सांगितले. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पीआयबीएमच्या शैक्षणिक मॉडेलला मान्यता मिळालेली असून उदयोन्मुख उद्योगांना पूरक असे नवीन अभ्यासक्रम सुरू केले असल्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी प्रीत म्हणाले की, संस्थेमधील अध्यापन केवळ सैद्धांतिक ज्ञानापुरते मर्यादित नसून प्रत्यक्ष अनुभव घेतलेले उद्योजक आणि तज्ञ अभ्यासक्रमात बनवण्यात योगदान देत असल्यानेच यशोपताका फडकत असल्याचे सांगितले. प्राध्यापक केवळ पीएचडीधारक नसून, कॉर्पोरेट संस्कृतीचीही त्यांना सखोल माहिती आहे, ज्यामुळे त्यांच्या शिकवण्याला व्यावहारिकतेची जोड आहे, हे त्यांनी आवर्जून नमूद केले.

संस्थेच्या कामगिरीविषयी अभिमानाने बोलताना त्यांनी, १७,०००-१८,००० माजी विद्यार्थी सध्या अग्रगण्य कंपन्यांमध्ये कार्यरत असल्याचे विशद केले .

## भारताच्या गेमिंग संस्कृतीच्या हृदयातील जीवनातील कथांना उजाळा देण्यासाठी बीजीएमआयने 'बियॉन्ड बॅटलग्राउंड्स' केले लाँच



**नागपूर, ८ ऑगस्ट :** आपल्या उत्साही बीजीएमआय चाहत्यांच्या नजरेतून आणि स्वप्नांमधून भारतीय गेमिंगचा आत्मा जिवंत करणारा 'बियॉन्ड बॅटलग्राउंड्स' हा डिजिटल कथाकथनाचा उपक्रम क्रॅफ्टन इंडियाने सादर केला आहे. यातून कंपनीने समुदाय, सर्जनशीलता आणि तळागाळातील नाविन्यपूर्णतेचे जोरदार प्रदर्शन केले आहे. राजस्थानच्या श्रीगंगानगर या वाळवंटी शहरातील २८ वर्षीय रेल्वे तंत्रज्ञ करण कारगवाल यांचा असाधारण प्रवास या चळवळीच्या अग्रभागी आहे. त्यांनी सर्व प्रकारच्या अडचणींना तोंड देत आपल्या सर्वसामान्य घराच्या छतावर पूर्णपणे कार्यक्षम, पूर्ण आकारातील प्रसिद्ध बीजीएमआय बग्गीची प्रतिकृती बांधली आहे.

भंगार धातू, साचलेले भाग, जुन्या मोटारसायकलचे इंजिन, वेल्डिंग टूल्स आणि फोन कॅमेरा या पलीकडे हातात काहीही नसताना करण यांनी वाळवंटातील कडक उन्हात असंख्य वीकेंड घालवून आपल्या आवडत्या गेममधील वाहनाला खऱ्या अर्थाने मानवंदना दिली आहे. अभियांत्रिकी किंवा डिझाइनचे कोणतेही औपचारिक प्रशिक्षण घेतलेले नसताना आणि भारतीय रेल्वेमध्ये पूर्णवेळ काम करताना, त्यांनी गेमप्ले स्क्रीनशॉट आणि ३ डी मॉडेल्सच्या आधारे बग्गीची रिव्हर्स-इंजिनिअरिंग केली. निव्वळ जिद्द, खेळावरील प्रेम आणि आपल्या कुटुंबाच्या पाठिंब्यावर त्यांनी हे साध्य केले.

मी कामानंतर विरंगुळा म्हणून बीजीएमआय खेळत असे. एक दिवस मला त्यातून असे काहीतरी वास्तविक बनवण्याची प्रेरणा मिळेल, असे कधीच वाटले नव्हते. पण खेळ आणि कष्टांच्या दरम्यान कुठे तरी एका कल्पनेने मी झपाटलो गेलो आणि मी ती सोडू शकलो नाही. ही बग्गी फक्त धातू आणि चाकांपेक्षा अधिक काही आहे. आवड आणि उद्देश जेव्हा एकत्र येतात, तेव्हा सर्वांत अनपेक्षित स्वप्नेही साकार होऊ शकतात याचा हा पुरावा आहे. या छोट्या शहरातील रचनेला राष्ट्रीय कथेत रूपांतरित केल्याबद्दल माझ्या कुटुंबाचा, माझ्या फॉलोअर्सचा आणि बीजीएमआयचा मी आभारी आहे, असे करण कारगवाल म्हणाले.

क्रॅफ्टन इंडियाचे पीपल ऑपरेशन्स प्रमुख सौरभ शाह म्हणाले, गेमिंग हे आता भारतात एक उच्चभ्रू क्षेत्र राहिलेले नाही. ती आता भारतातील लहान शहरांमधील क्रिएटर्सनी चालवलेली चळवळ आहे. क्राफ्टनमधील आम्ही या बदलाचे केवळ साक्षीदार नाही, तर आम्ही त्याचे समर्थन करत आहोत. बियाँड बॅटलग्राउंड्सच्या माध्यमातून आम्ही अशा दररोजच्या गेमर्सना पाठिंबा देत आहोत जे उत्कटतेचे रूपांतर उद्देशात आणि गेमप्लेचे रूपांतर वास्तविक जगाच्या प्रभावात करत आहेत. करणची बग्गी ही केवळ एक बांधणी नाही, तर ती जगाला क्वचितच आढळणाऱ्या ठिकाणी गेमिंगची महत्त्वाकांक्षा, सर्जनशीलता आणि अस्मिता कशी वाढत आहे याचे प्रतीक आहे.



## महाजेनकोचा कोळसा प्रकल्प सुरू करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**मुंबई, ८ ऑगस्ट :** महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड (महाजेनको) ला देण्यात आलेल्या गारे-पेल्मा सेक्टर-२ कोळसा खाणीचे काम लवकर सुरू करण्याची मागणी करीत रायगड जिल्ह्यातील तमनार ब्लॉकमधील अनेक गावांतील शेकडो बाधित ग्रामस्थ बुधवारी (६ ऑगस्ट) जिल्हा मुख्यालयात पोहोचले. त्यांनी जिल्हाधिकारी आणि रायगडच्या पोलिस आयुक्तांना भेटून निवेदन दिले. प्रकल्प सुरू न झाल्यास अनेक हातांना काम मिळेल त्यामुळे खाणीचे काम तातडीने सुरू करावे, अशी मागणी केली.

ढोलनारा, सरायटोला, भालुमाडा, कुंजीमुरा, मुडागाव, चितवाही, डोलेसरा आणि पाटा या गावांतील नागरिक वर्षानुवर्षांपासून आशा बाळगून होते की, महाजेनकोचा हा कोळसा प्रकल्प त्यांना कायमस्वरूपी उत्पन्न आणि सामाजिक सुरक्षा देईल. परंतु अद्याप अनेक ग्रामस्थांची जमीनच संपादित झालेली नाही. त्यामुळे भरपाईची प्रक्रियासुद्धा सुरू झालेली नाही. केवळ सर्वेक्षणावर नागरिकांची बोळवण करण्यात आल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली. वर्षानुवर्षांपासून तीच स्थिती असल्याचे यावेळी उपस्थितांनी निदर्शनास आणून दिले.

## उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेतील आशीचा स्वप्नील वेडिंग लुक सध्याच्या पेस्टल ट्रेंडने प्रेरित आहे



**मुंबई, ८ ऑगस्ट :** हृदयस्पर्शी कथानक आणि जिवंत व्यक्तिरेखा यामुळे सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेने प्रेक्षकांचे मन जिंकले आहे. आगामी भागांमध्ये, मालिका एका अत्युच्च बिंदूवर पोहोचणार आहे, जेव्हा कैरी शर्मा (आशी सिंह) चा विवाह होणार आहे. या विवाह-दृश्यात कैरीची वेशभूषा आधुनिक परी-कथेसारखीच आहे!

पारंपरिक लाल, मरून रंगांना फाटा देऊन, आशीच्या लुकमध्ये बॉलीवूडच्या पसंतीच्या पेस्टल छटा प्राबल्याने वापरल्या आहेत, ज्यांचे आजकाल सर्वत्र खूप चलन आहे. फिकट गुलाबी आणि आयव्हरी छटा असलेल्या तिच्या पोषाखावर नाजुक भरतकाम केले आहे. हा पोशाख अत्यंत शालीन आणि झोकदार दिसला आहे. त्याच्या सोबत आशीने पारंपरिक आभूषणे जशी की, ठसठशीत चोकर, माथा पट्टी आणि नथ यांचा उपयोग केला आहे, ज्याच्यामुळे भारदस्त लुक आला आहे. विविध बांगड्या आणि हलका मेकअप यामुळे वधूच्या रूपाला एक झळाळी मिळाली आहे. कैरी अगदी शाही पेस्टल परीकथेतून बाहेर आलेल्या परीसारखी दिसली आहे. हा लुक प्रेक्षकांना मोहित करत आहे. प्रेक्षक अलीकडच्या बॉलीवूड विवाहात दिसलेल्या फॅशनशी या लुकचे साम्य शोधत आहेत.

आपल्या लुकविषयी बोलताना आशी सिंह म्हणते, हे लग्नाचे दृश्य खूप विशेष आहे आणि हा लहेंगा परिधान करण्यास मी खूप उत्सुक होते. एक अभिनेत्री म्हणून मी आजवर अनेक पारंपरिक वेष घेतले आहेत, पण हा लुक काही औरच आहे. कारण हा खूपच रॉयल दिसत आहे. पोशाखापासून ते आभूषणे आणि सेटपर्यंत सगळे काही कसे जादुई दिसत होते. पेस्टल छटांमधून कैरीचे सौम्य व्यक्तिमत्त्व देखील सुंदर प्रकारे प्रतिबिंबित होते, ज्याचे माझ्याशीही साम्य आहे. त्याच वेळी, हा लुक आजकालच्या वधूच्या फॅशन ट्रेंडला अनुसरून आहे. प्रत्यक्ष जीवनासाठी यातून प्रेरणा घ्यावी असा हा लुक आहे!

## आज का अंदाज

**शनिवार ९ ऑगस्ट २०२५**

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार |
|---|---|---|---|---|
| ३ | ४ | ५ | ७ | |
| १४८ | १४९ | १६८ | २६९ | |
| ३४६ | २५७ | २६७ | ४५८ | |
| ४९० | ३४७ | ३६६ | ८९० | |
| ३२ | ४२ | ५१ | ७१ | |
| ३६ | ४६ | ५८ | ७८ | |
| ३० | ४० | ५९ | ७९ | |

**९ ऑगस्ट : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ५१ | ८३ | ९३ |
| २० | ५० | ८६ | ९४ |
| २७ | ५७ | ८४ | ९६ |
| २४६ | २३० | १३४ | १४४ |
| ३९० | ३४८ | २७९ | ४५० |
| ४८० | ७८० | ३६९ | ३६० |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासार्ठ जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

## स्वातंत्र्यदिनानिमित्त क्रोमामध्ये आकर्षक डील्स

**नागपूर, ८ ऑगस्ट :** टाटा परिवारातील एक सदस्य, भारतातील पहिले आणि सर्वात विश्वासार्ह ओम्नी-चॅनेल इलेक्ट्रॉनिक्स रिटेलर क्रोमाने त्यांचा बहुप्रतिक्षित स्वातंत्र्यदिन सेल जाहीर केला आहे. क्रोमासोबत यंदाचा स्वातंत्र्यदिन खरोखर खास बनवण्यासाठी सज्ज व्हा, कारण इथे विविध प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक्सवर उत्तम डील आणि आतापर्यंतची सर्वात मोठी सूट मिळत आहे. या सेलचा लाभ १७ ऑगस्ट २०२५ पर्यंत घेता येईल. देशभर पसरलेल्या ५६० हून अधिक क्रोमा स्टोअरमध्ये बंपर डील, उत्तम मूल्य, परवडणाऱ्या किमती आणि अतुलनीय श्रेणी उपलब्ध आहे.

स्मार्टफोनपासून ते टीव्ही, रेफ्रिजरेटर, वॉशिंग मशीन आणि इतर अनेक उत्पादने या सेलमध्ये आहेत. आकर्षक किमतीत सर्वात नवीनतम तंत्रज्ञान अपग्रेड करण्याची उत्तम संधी क्रोमाने आपल्या ग्राहकांना उपलब्ध करवून दिली आहे. इन्फिनिटी रिटेलच्या प्रवक्त्याने सांगितले की, या स्वातंत्र्यदिनी, क्रोमाने त्यांच्या आतापर्यंतच्या एका सर्वात मोठ्या सेलची सुरुवात केली आहे, ज्यामध्ये विविध श्रेणींमध्ये ५०% पर्यंत सूट देण्यात येत आहे. या सेलमध्ये १२,५०० रुपयांपर्यंतचा एक्सक्लुझिव्ह बँक कॅशबॅक, रोमांचक एक्सचेंज फायदे, शून्य-खर्च ईएमआय पर्याय आणि विशेष विद्यार्थी ऑफर देखील समाविष्ट आहेत. क्रोमाने ग्राहकांना त्यांचे तंत्रज्ञान अपग्रेड करणे आणखी सोपे केले आहे. या ऑफर ५६० हून जास्त क्रोमा स्टोअरमध्ये उपलब्ध आहेत, ज्यामुळे संपूर्ण भारतातील ग्राहकांना सुविधाजनक खरेदीचा अनुभव घेता येईल.

## राशीभविष्य

**मेष :** आज तुम्ही राजकारणात तुमच्या विरोधकांना पराभूत करू शकाल. दूरच्या देशातील नातेवाईकाची बातमी मिळेल. तुमच्या नोकरीत वरिष्ठ अधिकाजयाशी तुमची जवळीक वाढेल. व्यवसायात वाढ होईल.

**वृषभ :** आजचा दिवस आनंदाचा असेल. पूर्ण होणाजया कामातील अडथळे दूर होतील. कोणाच्याही प्रभावाखाली येऊ नका. तुमच्या शहाणपणाने आणि विवेकबुद्धीने काम करा.

**मिथुन :** सामाजिक कार्यात रस वाढेल. व्यवसाय क्षेत्राशी संबंधित लोकांना चढ-उतारांचा सामना करावा लागेल. तुम्हाला काही चांगली बातमी मिळू शकते. स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवा.

**कर्क :** तुम्ही कामाच्या ठिकाणी व्यस्त राहाल. काही महत्त्वाचे काम पूर्ण करताना तुम्हाला अडथळ्यांना सामोरे जावे लागू शकते. कामाच्या ठिकाणी तुमचे चारित्र्य शुद्ध ठेवा. प्रेमाने वागा.

**सिंह :** आज दिवसाची सुरुवात काही चांगल्या बातमीने होईल. कामाच्या ठिकाणी खूप धावपळ होणार नाही. सामाजिक कार्यात महत्त्वाची भूमिका बजावण्याची संधी मिळेल. व्यवसायातील नुकसान टाळता येईल.

**कन्या :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप शुभ आणि प्रगतीशील असेल. महत्त्वाच्या कामात काळजीपूर्वक विचार करून निर्णय घ्या. विरोधक तुमच्या प्रगतीचा हेवा करतील. नीट विचार करून निर्णय घ्या.

**तुळ :** आज अनावश्यक वादात पडू नका. तुम्हाला सामाजिक कार्यात महत्त्वाची जबाबदारी मिळू शकते. आज कामाच्या क्षेत्रात सुरू असलेल्या समस्या कमी होतील.

**वृश्चिक :** समाजातील उच्चपदस्थ आणि प्रतिष्ठित लोकांशी संपर्क वाढतील. व्यवसायात तुम्हाला नवीन भागीदार मिळतील. कोणाच्याही प्रभावाखाली येऊ नका. व्यवसाय क्षेत्रात नफा मिळेल.


**धनु :** आजचा काळ अधिक फायदेशीर आणि प्रगतीशील असेल. आधीच नियोजित कामांमध्ये तुम्हाला यश मिळेल. तुमच्या विरोधकांपासून सावध रहा. तुमच्या योजना कोणासमोरही उघड करू नका.

**मकर :** आज दिवसाची सुरुवात काही चांगल्या बातम्यांनी होईल. कामाच्या ठिकाणी अधीनस्थांशी अनावश्यक वाद टाळा. महत्त्वाच्या कामांमध्ये प्रगती होईल. संवेदनशीलता वाढवण्याची गरज असेल.

**कुंभ :** आज तुम्हाला महत्त्वाच्या बाबींमध्ये काळजीपूर्वक विचार करून निर्णय घ्यावे लागतील. घाईघाईत कोणताही मोठा निर्णय घेऊ नका, विशेषत: कामाच्या बाबतीत. भावनांवर नियंत्रण ठेवा.

**मीन :** सामाजिक कार्यात रस वाढेल.लांब पल्ल्याच्या प्रवासात सावधगिरी बाळगा. घाईघाईत कोणावरही विश्वास ठेवू नका. राजकारणात सहभागी असलेल्या लोकांच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील.

## शब्दकोडे क्रमांक २१८६



**आडवे शब्द :-**
१) खूप, फार, अतिशय
३) माणूस, आदमी
६) कृश होणे वाळणे
८) सर्प
१०) बगळा
१२) श्रीयुत
१३) अपहार
१४) तात्काळ
१७) आरडाओरड, कल्लोळ
१९) गोंधळ व अव्यवस्थेची स्थिती
२३) समशेर
२५) छिद्रातून जमिनीवर पडणारा
२९) निराश
३१) सापाची एक जात
३२) युक्ती
३४) एक द्विदल धान्य
३५) विहिरीतून पाणी काढण्याचे विशिष्ठ प्रकारचे भांडे
३७) मन स्वाधीन असलेला, लहरी, निधड्या छातीचा
३९) वाहतूक
४१) चाकरी करणारा
४२) देणारा
४३) निमित्त
४४) आरोप
४८) एकाद्यास मृत्युपासून वाचविणे
५१) कान
५२) पाणी
५३) एक प्रश्नार्थक शब्द
५४) पुरुष
५६) फायदा
५७) होडी, जहाज इ
६०) मोठी सुरी
६१) अमृत
६२) बुटका, बटु
६३) आकाशाला भिडणारे
६४) विष
६६) मालक
७१) मृत्यू नसलेला
७३) लाकूड कापण्याचे साधन
७५) श्रम, मेहनत
७६) नर्तन
७७) राजाला, वरिष्ठाला दिलेली भेट वस्तू
७८) उंट हाकणारा

**उभे शब्द :-**
१) अमर्याद
२) विडा साहित्याचे ताट
४) सारखा
५) राजा
६) घोडा
७) कमळाचे तळे
८) तात्पर्य
९) मातीचा दिवा
११) जेमतेम, मोठ्या मुश्किलीने
१३) वस्तुंच्या जागा सारख्या बदलणे
१५) चिकटविणे
१६) मातीचा कण
१८) शंकर
२०) अंड्यातील पिवळा भाग
२१) प्राचीन
२२) पद्धत
२४) वल्लरी
२५) पंकज
२६) भित्रा
२८) मदत
३०) शांत करणे
३२) एक रत्न
३३) माया, प्रेम
३४) पाणी
३६) कापडाचा एक प्रकार
३८) घेणे, अंगीकार
३९) गोव्याची राजधानी
४१) छचोर चाळे करणारी स्त्री
४२) किंमत
४६) संपूर्ण
४७) त्रास, कष्ट
४९) सिंह
५०) दरवाजा
५२) आपले राष्ट्रगीत
५५) गाढव
५७) लोकसंख्येची मोजणी
५८) यज्ञ
५९) उंदीरासारखा एक प्राणी
६१) परमेश्वर
६५) एकाच्या हातातून दुसऱ्याच्या हाती देणे
६६) हिंमत, धैर्य
६८) नवऱ्याचा भाऊ
६९) नशीब
७२) पराग
७३) मणका
७४) व्रत

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# हरित सप्ताहाचे आयोजन जिल्ह्यातील वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करा जिल्हाधिकारी अजित कुंभार

**अकोला :** राज्य शासनाच्या हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या अभियानात ८ ते १५ ऑगस्ट दरम्यान हरित सप्ताह राबविण्यात येत असून जिल्ह्यातील वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी भरीव वृक्षलागवड व्हावी. सर्व यंत्रणांनी समन्वयाने हा उपक्रम यशस्वी करावा असे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज दिले.हरित सप्ताहाच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी वन विभाग, सामाजिक वनीकरण, स्थानिक स्वराज्य संस्था, महापालिका, जिल्हा परिषद, विविध यंत्रणांच्या कार्यवाहीचा ऑनलाइन आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. सर्व संबंधित यंत्रणांचे अधिकारी या ऑनलाइन बैठकीला उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री कुंभार म्हणाले की, जिल्ह्यात दोन लक्ष वृक्ष लागवड होणार असून आपापले विभागांना दिलेल्या उद्दिष्टानुसार हे काम पूर्ण होईल यासाठी सर्वंकष प्रयत्न करावे. अमृतवृक्ष ॲपवर फोटो अपलोड करावे. शिक्षण विभागाने शाळा, महाविद्यालयाचा सहभाग मिळवून देऊन मोहीम खेडोपाडी व्यापक स्वरूपात राबवली जाण्यासाठी सहकार्य करावे. वन व सामाजिक वनीकरण विभागाने रोपे उपलब्ध करून द्यावीत. सर्व विभागांनी उद्दिष्टानुसार झाडे लावली जातील याची दक्षता घेण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.ते पुढे म्हणाले की, स्वातंत्र्य दिनानिमित्त घरोघरी तिरंगा मोहीम राबविण्यात येत आहे.

# कृषि पदवीधरांसाठी सेंद्रिय शेतमाल प्रामाणिकरण उभरते सेवाक्षेत्र : कुलगुरु

**▪अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :**

सेंद्रिय पद्धतीने उत्पादित सकस विषमुक्त अन्नधान्य, फळे-भाजीपाला खरेदीकडे ग्राहकांचा कल वाढतच असून इतर देशांना देखील सेंद्रिय शेतमाल निर्यात होतांना शुद्धता, गुणवत्ता आणि प्रामाणिकरण अत्यावश्यक असल्याचे सांगताना डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी कृषी पदवीधरांसाठी सेंद्रिय व्यवस्थापन पद्धती आणि प्रमाणीकरण हा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम शाश्वत रोजगार व स्वयंरोजगार निर्मिती साधणारा असल्याचे आश्वासक प्रतिपादन केले.



डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, इकोसर्ट, फ्रान्स आणि कॉटन कनेक्ट साऊथ एशिया यांचे संयुक्त विद्यमाने सन २०२२ पासून देशातील पहिल्या सेंद्रिय व्यवस्थापन पद्धती आणि प्रमाणीकरण ह्या पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाची मुहूर्तमेढ रोवली असून या अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या तूकडीच्या पदवीका प्रदान समारंभांचे अध्यक्ष स्थानावरून उपस्थित पदवीकांक्षीना संदेशपर संबोधित करताना ते बोलत होते. सदर सेंद्रिय अभ्यासक्रमाचा पदविका प्रदान सोहळा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे अध्यक्षतेत व प्रमुख उपस्थितीत दिनांक ७ ऑगस्ट २०२५ रोजी पार पडला. शेतकरी सदनाच्या कृषि जागर सभागृहात संपन्न झालेल्या या अतिशय महत्त्वाकांक्षी आणि तितक्याच भावनाप्रधान सोहळ्याचे प्रसंगी विद्यापीठाचे संचालक संशोधन डॉ. श्यामसुंदर माने, अधिष्ठाता कृषी डॉ. देवानंद पंचभाई, संचालक विस्तार शिक्षण डॉ.धनराज उंदीरवाडे, इकोसर्ट इंडिया चे व्यवस्थापकीय संचालक अनिल जाधव, वरिष्ठ व्यवस्थापक मुकेश अपचंदा, कॉटन कनेक्ट साउथ एशियाचे वरिष्ठ व्यवस्थापक हेमंत कुमार ठाकरे , जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे, प्रकल्प संचालक आत्मा तथा डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन चे डॉ. मुरली इंगळे, कृषी विद्या विभागाच्या प्रमुख तथा अभ्यासक्रमाच्या संचालक डॉ. अनिता चोरे आदींची व्यासपीठावर विशेष उपस्थिती होती.

# जिल्हाधिकारी अजित कुंभार यांची

## लक्षेश्वर संस्थान लाखपुरी येथे भेट

**▪लाखपुरी,दि ८ (प्रतिनिधी) :**

मुर्तिजापूर तालुक्यातील लाखपुरी येथील लक्षेश्वर संस्थान ला जिल्हाधिकारी अकोला अजित कुंभार यांनी भेट दिली. त्यांनी कावड यात्रा निमित्त मुख्य रस्त्याची पाहणी व घाट व मंदिरातील झालेल्या बांधकांमाची पाहणी केली.येणा-या कावळयात्रे प्रशासनाकडुन उपाययोजना करण्यात याव्या जेणे करुन भावी भक्तांना सोई सुविधा उपलब्ध होईल.

आमदार हरिष पिपळे यांनी जिल्हा अधिकारी अजित कुंभार यांचे वेधले लक्ष, मान्यवरांच्या वतीने सर्व प्रथम लक्षेश्वर महाराजाचे दर्शन घेण्यात आले



.कावड उत्सव मंडळाचे अध्यक्ष मुर्तिजापुर चे आमदार हरीष पिंपळे यांनी जिल्हाधिकारी अजित कुंभार यांचे पुष्पगुच्छ व लक्षेश्वर भगवान यांची प्रतिमा देऊन स्वागत केले , तसेच आमदार हरीश पिंपळे यांचे स्वागत सरपंच राजप्रसाद कैथवास यांनी केले.

तहसीलदार शिल्पा बोबडे यांचे स्वागत संस्थांच्या वतीने तुळिशराम वरणकार यांनी केले.

# स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीसाठी भाजप अलर्ट

## आ. रणधीर सावरकर यांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत बैठका

**▪अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :**

आगामी काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी अलर्ट झाली आहे. त्यानिमित्ताने देवरी फाटा येथील वेताळबाबा संस्थांनच्या सभागृहात भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. या बैठकीला आमदार रणधीर सावरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिल्हा कार्यकारणी व चोहोटा मंडळातील नवनियुक्त पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या विविध योजना ह्या ग्रामीण भागातील जनतेसाठी हितासाठी असतात. त्यासाठी शासनाच्या वतीने मोठ्या प्रमणावर निधी उपलब्ध करून दिल्या जातो. परंतु समाजातील शेवटच्या घटकापर्यंत त्या योजणांचा लाभ पोहोचत नाही. यांची खन्त आमदार रणधीर सावरकर यांनी व्यक्त केली. आजरोजी केंद्रात आणि राज्यात भारतीय जनता पार्टीचे सरकार आहे. त्यामुळे आता अकोला जिल्हा परिषदेची



सत्ता सुद्धा आपल्या हाती खेचून आणाण्यासाठी आपण सर्वांना तयारीला लागायचं आहे. जिल्हा परिषदेत भारतीय जनता पार्टीची सत्ता आल्यास गोर गरीब नागरिकांपर्यन्त सर्व योजणांचा लाभ आपल्याला पोहचवता येईल. असे आमदार सावरकर यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्याशी संवाद साधताना व्यक्त केले. याप्रसंगी मंचावर जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकार,शेषराव पाटील, मधुकर पाटकर, विजयसिह सोळंके, विनोद मंगळे, राजेश नागमते उपस्थित होते.

# महामंडळांची कार्यालय सामाजिक न्यायभवनात स्थलांतरित

**▪अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ व महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे कार्यालय निमवाडी परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनात स्थलांतरित झाली आहेत.

या दोन्ही महामंडळांची कार्यालये तापडिया नगरात मोहन भाजी भांडारालगतच्या साठे इमारतीत होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या नूतन इमारतीत ही कार्यालये स्थलांतरित झाली आहेत.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी करीता सज्ज व्हा : डॉ शशिकांत खेडेकर

## तेल्हारा येथे शिवसेनेची आढावा बैठक संपन्न

**▪तेल्हारा,दि.८ (प्रतिनिधी) :**

शिवसेनेचे मुख्य नेते महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार उपनेते संपर्क प्रमुख मा.आमदार गोपीकीशन बाजोरिया यांच्या नेतृत्वात अकोला जिल्हा निरीक्षक मा आमदार डॉशशिकांत खेडेकर जिल्हा प्रमुख मा आमदार नारायणराव गव्हाणकर जिल्हा प्रमुख चंद्रशेखर पांडे गुरुजी अनुसूचित जाती जिल्हा अध्यक्ष डोंगरेसर यांच्या प्रमुख मार्गदर्शनात शिवसेना युवासेना तेल्हारा तालुका व शहर आढावा बैठक तेल्हारा विश्रामगृह येथे पार पडली यावेळी तालुका व शहरातील सर्व आजी माजी पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते स्थानिक पातळीवर संघटन मजबूत करण्यासाठी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन वरीष्ठ पदाधिकारी



यांच्या कडून करण्यात आले तेल्हारा तालुका प्रतिनिधी शिवसेना पक्षाच्या वतीने जिल्हा परिषद,पंचायत समिती तसेच नगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मार्गदर्शक आढावा बैठक तेल्हारा विश्रामगृह येथे पार पडली.या बैठकीत संपर्क प्रमुख मा.आमदार गोपीकिशनजी बाजोरिया अकोला जिल्हा निरीक्षक मा आमदार डॉ शशिकांत खेडेकर जिल्हा प्रमुख मा.आमदार नारायणराव गव्हाणकर,जिल्हाप्रमुख मा.चंद्रशेखर पांडे गुरुजी,अनुसूचित जाती जिल्हाध्यक्ष श्री.डोंगरेसर यांची प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन लाभले.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या तयारीसाठी विविध सूचना उपस्थित वरिष्ठ पदाधिकारी यांनीउपतालुकाप्रमुख जि.प.सर्कल प्रमुख प.स.सर्कल प्रमुख तालुका व शहरातील आजी माजी पदाधिकाऱ्यांना शिवसेनेचा भगवा आगामी निवडणुकांमध्ये फडकविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे निर्देश आले.

# ज्योती सावित्री ब्रिगेड तर्फे दिव्यांग सोशल फाउंडेशन च्या

## सामाजिक उपक्रमात दिला एक हात सहकार्याचा



**▪अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :**

स्थानिक दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला च्या माध्यमाने संस्थापक अध्यक्ष डॉ.विशाल कोरडे यांच्या मार्गदर्शनात विविध सामाजिक उपक्रम संपूर्ण भारतभर राबवले जात आहेत. दि.८ ऑगस्ट २०२५ रोजी श्री शिवाजी महाविद्यालय अकोला, दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला व ज्योती सावित्री ब्रिगेड अकोला तर्फे दिव्यांग बांधवांच्या संगणक प्रशिक्षणासाठी संस्थेला लॅपटॉप भेट देण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.रामेश्वर भिसे, दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला चे संस्थापक अध्यक्ष डॉ. विशाल कोरडे, सहसचिव डॉ.संजय तिडके, ज्योती सावित्री ब्रिगेड अकोलाच्या अध्यक्ष भारती शेंडे, माजी नगरसेविका वनिता राऊत व सुमित्रा निखाडे उपस्थित होत्या.आपल्या प्रास्ताविकात विशाल कोरडे यांनी ग्रामीण विभागातील दिव्यांग व्यक्तींसाठी संगणक प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन केले जाणार असल्याचे सांगितले.

# निवृत्ती वेतनधारकांचे प्रश्न तातडीने आणि प्राधान्य क्रमाने सोडविण्यात येतील

## जिल्हा कोषागार कार्यालय, अकोला येथे निवृत्ती वेतनधारकांचा मेळावा संपन्न

**▪अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :**

राज्य निवृत्तीवेतन धारकांचे प्रश्न तातडीने आणि प्राधान्य प्रमाणे सोडवण्यात येतील त्यांना कोषागार कार्यालयात सन्मानाची वागणूक मिळेल कोणतेही प्रश्न प्रलंबित राहणार नाहीत याची दक्षता घेण्यात येईल असे आश्वासन जिल्हा कोषागार अधिकारी डॉ मा ब झुंजारे यांनी दिले ते राज्य शासन सेवेतून निवृत्त झालेल्या निवृत्ती वेतनधारकांच्या जिल्हा कोषागार कार्यालय, अकोला चे वतीने नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे आयोजित आढावा बैठक आणि निवृत्तीवेतनधारकांचा मेळावा प्रसंगी बोलत होते

डॉ. मा. ब. झुंजारे, यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सभेमध्ये अकोला जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य पेन्शनर्स असोसिएशन चे उपाध्यक्ष ग्रंथमित्र से.नि. प्राचार्य डॉ. सत्यनारायण बाहेती, उपाध्यक्ष रामभाऊ बिरकड, सचिव एकनाथ उके, प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते कार्यक्रमाच्या प्रारंभी मागील काळात दिवंगत झालेल्या निवृत्तीवेतनधारकांना दोन मिनिटे उभे राहून




श्रद्धांजली अर्पण करण्यात आली उपस्थित मान्यवरांचे अतिथींचे स्वागत पुष्पगुच्छाने करण्यात आले. पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष प्राचार्य डॉ सत्यनारायण बाहेती यांनी पेन्शनर्सच्या समस्या मांडून आढावा बैठक घेतल्याबद्दल जिल्हा कोषागार अधिकारी आणि त्यांचे सहकारी यांचे अभिनंदन आणि आभार व्यक्त केले त्रैमासिक आढावा बैठक नियमित व्हावी अशी सूचनाही त्यांनी केली.

तसेच संघटनेच्या सदस्यांनी सुद्धा स्वतः जागृत राहून व्हाट्सअप वर येणाऱ्या विविध भ्रम निर्माण करणाऱ्या माहिती पासून सावध राहावे असे आवाहन केले संघटनेचे सचिव एकनाथराव उके आणि उपाध्यक्ष रामभाऊ बिरकड यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यांनीही काही प्रश्न उपस्थित केले ते प्रशासनाबरोबरच संघटने कडूनही सदस्यांना सहकार्य मिळेल. अशी ग्वाही दिलीसभागृहात उपस्थित सेवानिवृत्ती वेतन धारकां नी आपल्या समस्या, अडचणी आणि शंका अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. जिल्हा कोषागार अधिकारी, डॉ. मा. ब. झुंजारे, अप्पर कोषागार अधिकारी सविता भगत तसेच कनिष्ठ लेखापाल प्रा. प्रकाश बागडे यांनी अतिशय शांततेने समस्या, अडचणी ऐकुण त्यांच्या शंकेचे निरसन केले.

## थोडक्यात

### वणी रंभापूर येथे महसूल सप्ताह निमित्ताने विविध कागदपत्रे वाटप



**वणी रंभापूर :** महसूल विभागाच्या वतीने ऑनलाईन महासेवा केंद्र ( सेतू) वणी रंभापूर यांच्या सहकार्याने छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान शुक्रवारला राबवण्यात आला आहे .यावेळी वणी येथील सेतू केद्रात महसूल विभागाच्या सगळ्या योजना जसे आधार अपडेट , ॲग्रीस्टँक , पी एम किसान , संजय गांधी निराधार योजना , सातबारा दुरुस्ती , वारसाची नोंद शैक्षणिक , उत्पन्न दाखला वय अधिवास अशा कागदपत्रे विविध प्रकारच्या महसुली विभागा अंतर्गत येणाऱ्या कागदपत्रे वाटप शुक्रवार ला मंडळ अधिकारी हरीहर निमकंडे , तलाठी दिशाताई चौधरी यांचे मार्गदर्शनात छोटेखानी कार्यक्रमात वाटप करण्यात आली यावेळी कार्यक्रमांचे अध्यक्ष अमोल मुळे हे लाभले असून सेतू संचालक मनीष तिवारी , शेतकरी हरिष हरणे, आरोळीचे संचालक समाधान वानखडे यांच्या हस्ते विविध प्रकारच्या कागदपत्राचे वाटप करून महसूल विभागाच्या अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना ची माहिती मनीष तिवारी यांनी उपस्थित नागरिकांना दिली.

### अभाविप अकोला जिल्हा अभ्यास वर्ग यशस्वीरित्या पार पडला



**पातुर :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद अकोला जिल्हा अभ्यास वर्ग दिनांक ०२ व ०३ ऑगस्ट २०२५ (शनिवार व रविवार) रोजी श्री सीदाजी महाराज संस्थान, पातूर येथे यशस्वीरित्या संपन्न झाला.या दोन दिवसीय अभ्यास वर्गामध्ये कार्यकर्त्यांना संघटनात्मक कार्य, नेतृत्वगुण, राष्ट्रीय विचारधारा आणि विद्यार्थी समस्यांवर उपाययोजना या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. तसेच कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडले. अभ्यास वर्गाने अकोला जिल्ह्यातील कार्यकर्त्यांमध्ये नवीन ऊर्जा व चैतन्य निर्माण केले.

या वर्गाला पूर्ण जिल्ह्यातून १०५ हून अधिक विद्यार्थी सहभागी

# कृषी महाविद्यालय अकोल्याच्या विद्यार्थ्यांकडून वाशिंबा यथे पशुधनाचे शास्त्रोक्त व्यवस्थापन व लसीकरणाबाबत जनजागृती

## कृषी महाविद्यालय, अकोलाचा उपक्रम!

**▪अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :**

कृषि शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थांना महाविद्यालयीन शिक्षणाची कृतियुक्त जोड मिळण्याचे हेतूने ग्रामीण कृषि कार्यानुभव कार्यक्रम (रावे) अंतर्गत एका हंगामासाठी प्रत्यक्ष शेतकरी बांधवाचे शेतावर जात दैनंदिन अभ्यास नोंदी घ्याव्या लागतात तथा विद्यापीठ संशोधित आधुनिक तंत्रज्ञान आणि शेतकरी बांधवांची प्रचलित पद्धतीची सांगड घालत शाश्वत शेती तंत्रज्ञान प्रचार-प्रसार साध्य होते. याचं उपक्रमा अंतर्गत कृषी महाविद्यालय, अकोला येथील ग्रामीण कृषि कार्यानुभव कार्यक्रम (रावे) २०२५ च्या सहभागी विद्यार्थ्यांनी दिनांक ७ ऑगस्ट रोजी वाशिंबा गावातील गोपालक शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण जनजागृती उपक्रम राबवला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी



आनंद आश्रम गोसेवा अनुसंधान केंद्राला भेट जातिवंत पशुधन संवर्धन, व्यवस्थापन व लसीकरण विषयी माहिती संकलित केली. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला संलग्नित कृषि महाविद्यालय, अकोला येथील मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर - विभाग रंभापूर अंतर्गत ग्रामीण कृषि कार्यानुभव कार्यक्रम (RAWE & AIA) २०२५-२६ अंतर्गत आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संजय भोयर तसेच पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र शाखा प्रमुख डॉ. प्रकाश कहाते व रावे सहायक डॉ. अनिल खाडे पाठबळाला उपस्थित होते. सदर कार्यक्रमात पशुधन विकास अधिकारी डॉ. विकास लोडे (बोरगाव) आणि डॉ. दीपक बोराडे (दहेगाव) यांनी मार्गदर्शन केले.

# शिव महा पुराण कथेचा काल्याचे कीर्तनाने सांगता



**▪हिवरखेड,दि ८ (प्रतिनिधी) :**

येथे सालाबाद प्रमाने मोठा महादेव सस्थान रजी नंबर ९८४ चे प्रांगनात श्रिमद भागवत मर्मज्ञ शिवकथाकार हभप रामदास महाराज चेडे नांदेड बु यांचे मधुर वाणीतुन दिनांक१/८/२५/ते सांगता दि ८/८/२५ शुक्रवार संपन्न झाले यावेळी दैनदिनी सकाळी ५ ते ६ काकडा दूपारी १ ते ५ महाराजाचे मुखद वानीतुन कथा सांयकाळी ६ ते७ हरीपाठ तर रात्रीला महाराष्ठातील नामवंत कीर्तनकार दिनांक १ ते ८ पर्यत हभप सूनिल महाराज घारळ, हभप कृष्णा महाराज सदाफळे,हभप सूधिर महाराज खलोकार, हभप धनश्रीताई बांते, हभप गायकवाड महाराज, हभप माधुरीताई माळोकार हभप हरीमहाराज राशिणकर तर आज शिवपुरान कथावाचक रामदास महाराज चेडे यांचे काल्याचे कीर्तन झाले.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक श्री**कृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)



# रक्षाबंधन

## रक्षाबंधन आणि स्त्री सुरक्षा !

हिंदू संस्कृतीत भाऊ-बहिणीचे नाते हे अत्यंत पवित्र मानले जाते. रक्षाबंधनाच्या दिवशी बहीण भावाच्या मनगटाला राखी बांधून त्याच्याकडून तिच्या रक्षणाचे वचन घेते. भाऊसुद्धा 'प्राणपणाने तुझे रक्षण करेल', असे बहिणीला वचन देतो.

या दिवशी बहीण आपल्या भावाच्या उत्तम आरोग्यासाठी आणि समृद्धीसाठी देवाकडे प्रार्थना करते तर भाऊसुद्धा बहिणीच्या दीर्घायुष्यासाठी, सुखसंपन्नेतेसाठी आणि संरक्षणासाठी देवाकडे याचना करतो. सहस्त्रो वर्षांची परंपरा लाभलेल्या या सणाला भाऊ बहिणीतील अतुल प्रेमाची, आदराची आणि निष्ठेची जोड आहे.

द्वापारयुगात एकदा भगवान श्रीकृष्णाच्या मनगटाला जखम होऊन त्यातून रक्त वाहू लागले, हे पाहताच द्रौपदीने क्षणाचाही विलंब न करता नेसलेल्या भरजरी वस्त्राच्या टोकाचा एक तुकडा फाडून श्रीकृष्णाच्या मनगटाला बांधला. तेव्हापासून बहीण भावाच्या पवित्र नात्याचा हा उत्सव साजरा केला जाऊ लागला.

रक्षाबंधनाच्या दिवशी सूर्योदयी स्नान करतात. उपकर्म करून ऋषींचे तर्पण करतात अपराह्नकाळीं राखी तयार करतात. तांदूळ, सोने आणि पांढऱ्या मोहऱ्या एकत्र करून त्यांची पुरचुंडी तयार केली जाते, जिला राखी म्हटले जाते. या राखीचे पूजन केले जाते . त्यानंतर

*'येन बद्धो बली राजा दानवेन्द्रो महाबलः ।*
*तेन त्वामपि बध्नामि रक्षे मा चल मा चल ॥'*

हा मंत्र म्हणून बहीण भावाला ही राखी बांधते. 'महाबली दानवेंद्र बळी राजा जिने बद्ध झाला, त्या रक्षेने मी तुलाही बांधतो. हे रक्षे, तू चलित होऊ नकोस' असा या मंत्राचा अर्थ आहे.

कालागणिक हा सण साजरा करण्याची पद्धत जरी बदलली असली, तरी सणामागील उद्देश मात्र तोच आहे. आज आपला भाऊ साता समुद्रापार जरी असला तरी बहीण त्याला राखी पाठवायला विसरत नाही. ज्या बहिणींना सख्खा भाऊ नसतो ती अन्य पुरुषाला किंवा चंद्राला आपला भाऊ मानते आणि हा सण साजरा करते.

*यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः*
*यात्रेतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः*

अर्थात ज्या कुळामध्ये स्त्रीची पूजा, म्हणजेच तिचा मान- सन्मान होतो, त्या कुळात सुशील आणि गुणसंपन्न संतती जन्माला येते. ज्या ठिकाणी स्त्रीचा अपमान होतो त्या कुळाची प्रगती खुंटते हा संस्कार हिंदू धर्मग्रंथांनी केल्यामुळे हिंदू धर्मात स्त्रीला नेहमीच आदराचे आणि सन्मानाचे स्थान दिले गेले आहे.

रक्षाबंधन हा सणसुद्धा स्त्रीच्याप्रती आदर व्यक्त करणाराच आहे. आठशे वर्षांपूर्वी संत ज्ञानेश्वरांनी पसायदानातून विश्वबंधुत्वाची शिकवण दिली आहे. लहानपणी शाळेतसुद्धा सारे भारतीय माझे बांधव आहेत, अशी प्रतिज्ञा करूनच प्रत्येक जण मोठा झाला आहे. दुर्दैवाने या सर्वांचा आजच्या तरुण वर्गाला विसर पडला आहे.

आजमितीला देशासह राज्यातील स्त्रियांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. दोन वर्षाच्या बालिकेपासून ८० वर्षाची वृद्धाही नराधमांच्या वासनेतून सुटत नाही.

आपल्या बहिणीला रक्षणाचे वचन देणारा भाऊ अन्य स्त्रीमध्ये आपल्या भगिनींचे रूप का पाहू शकत नाही. आपल्या संस्कृतीचा आपल्यालाच विसर पडू लागला आहे का?

छत्रपती शिवाजी महाराज हे आजच्या पिढीचे दैवत आहेत, आजचा तरुण एकवेळ आईवडिलांचा अपमान सहन करेल; मात्र छत्रपती शिवाजी महाराजांविषयी अपशब्द काढणाऱ्याची जीभ छाटल्याशिवाय राहणार नाही. आज मंदिरातील देवांच्या मूर्ती शाबूत आहेत ते छत्रपती शिवाजी महाराजांमुळेच.

पाच बलाढ्य पातशाह्यांविरोधात लढून महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. रयतेला भयमुक्त केले. व्यापाराचे निमित्त करून सत्ताकारणात ढवळाढवळ करू पाहणाऱ्या इंग्रजांना त्यांची जागा दाखवून दिली. आपल्या अधिकाराचा गैरवापर करून महिलेवर अत्याचार करणाऱ्या रांझे पाटलाचा चौरंगा करून छत्रपती शिवाजी महाराजांनी एक आदर्श स्वराज्यासमोर निर्माण केला.

स्वराज्यातील स्त्रीकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्याची काय स्थिती होऊ शकते याचे उदहारण त्यांनी जगासमोर उभे केले. त्यानंतर कोणाची हिम्मत झाली नाही स्वराज्यातील स्त्रियांकडे वासनेच्या नजरेने पाहण्याची.

शिवाजी महाराजांना देव मानणारा आजचा तरुण लुटीच्या मुद्देमालासह आलेल्या कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला सन्मानाने स्वगृही पाठवणाऱ्या शिवाजी महाराजांची वृत्ती अंगी केव्हा बाणवणार आहे? स्वराज्यातील बाया बापड्यांच्या रक्षणासाठी स्वतःचे प्राण धोक्यात घालणाऱ्या संभाजी महाराजांचा आदर्श आजचा तरुण कधी अंगिकारणार आहे?

जो देश आपल्या इतिहासातून धडे घेत नाही तो देश रसातळाला जातो अशी एक म्हण आहे. आजच्या तरुणांची स्थितीही काहीशी अशीच झाली आहे.

आज तरुणांना गरज आहे इतिहासातील थोर पुरुषांच्या चरित्रातून धडे घेऊन आपले चारित्र्य घडवायची. आजचे सरकार राज्यातील भगिनींना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने अंतर्गत दरमहा १५०० रुपये देत आहे ; मात्र बहिणींना केवळ आर्थिक साहाय्य करणे एव्हढेच भावाचे कर्तव्य नसून बहिणीच्या रक्षणाची सर्वस्वी जबादारी घेणे हे भावाचे प्रमुख दायित्व आहे.

राज्याची परिस्थिती पाहता राज्यातील भगिनींना आर्थिक मदतीपेक्षा सुरक्षिततेचीच अधिक आवश्यकता आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील महिलेवर अत्याचार करणाऱ्या रांझे पाटलाचे हात पाय कलम करून वासनांधांवर अंकुश निर्माण केला होता. महाराष्ट्रातही अशा कठोर कायद्याची आज नितांत गरज आहे.

स्त्री अत्याचाराच्या विरोधात ज्यावेळी कठोर कायदे अमलात येऊन त्यांची प्रामाणिकपणे अंमलबजावणी केली जाईल, ज्या दिवशी स्त्री अत्याचाराचा आलेख घसरू लागेल आणि ज्या दिवशी एका स्त्रीच्या रक्षणासाठी हजारो मनगटे पुढे सरसावतील त्या दिवशी रक्षाबंधनाचा उद्देश खऱ्या अर्थाने साध्य झाला असे म्हणता येईल.

■ ■ ■



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

# रक्षाबंधन : स्नेहाचे ऋणानुबंध चिरकाल टिकावेत !

श्रावणमास पर्व हे समाज जीवनाचे प्रतिबिंब आहे. रक्षाबंधन हे एक सामाजिक व धार्मिक पर्व आहे. हे पर्व सामाजिक परंपरेमध्ये सद्भाव, स्नेह, आत्मियता, बंधुभाव, कौटुंबिक एकात्मता यांचा प्रवाह निर्माण करणारे आहे. खऱ्या अर्थाने संस्कृतीला समृध्द बनविणारे, आध्यात्मिक स्पर्शाने जनमनाला पुलंकित करणारे पर्व आहे, रक्षाबंधन पर्व!

--------------

राणी कर्णावतीने आपल्या रक्षणासाठी हुमायूँ राजाला भाऊ मानून बांधलेली राखी इतिहासाच्या पानावर कोरल्या गेली. हिंदू-मुस्लिम यांच्यामधील स्नेह व एकी निर्माण करणारी ही जीवंत साक्षच आहे. स्त्री जातीच्या रक्षणासाठी धर्म, जाती, लिंग या भेदांना छेदून पुढे टाकलेले एक पाऊल आहे हे!

राष्ट्रीय एकात्मेला पोषक व वर्धक प्रसंग समाजात सद्भावना व सत्प्रवृत्तींचे पोषण करण्याचे कार्य करतात. आपल्या भाऊरायाला बहीण राखी बांधते व आपल्या रक्षणाची अप्रत्यक्षरीत्या हमी घेते. हिंदू संस्कृतीतील समाजमुल्यांचे पोषण करणारी ही सामाजिक परंपरा आजही मोठया दिमाखाने देशात सर्वत्र नांदतांना दिसत आहे.

हिंदू पौराणिक कथेनुसार, महाभारतात, जे एक महान भारतीय महाकाव्य आहे, पांडवांची पत्नी द्रौपदीने भगवान श्रीकृष्णाच्या मनगटामधून वाहणारे रक्त थांबवण्यासाठी तिने तिच्या साडीचा कोपरा फाडून त्याच्या मनगटावर बांधला. त्यामुळे भगवान श्रीकृष्ण यांच्यात एक बंध निर्माण झाला आणि द्रौपदीचे रक्षण करण्याचे वचन त्यांनी तिला दिले.

राखी बांधताना बहिणीने म्हणावे,

*येन बद्धो बली राजा*
*दानवेन्द्रो महाबलः।*
*तेन त्वामनुबध्नामि*
*रक्षे मा चल मा चल*

(दानवांचा राजा बली यांच्या हातात दैत्यगुरू शुक्राचार्य यांनी जशी रक्षा (राखी) बांधली होती तशीच ही राखी मी तुझ्या हाताला बांधत आहे)

रक्षाबंधनाची सुरुवात केव्हा झाली, याबद्दल निश्चित पुरावा नाही; पण त्याविषयी एक आख्यायिका आहे. पूर्वी देवदानवांच्या युद्धात दानवांच्या शक्तीपुढे देवांचे काही चालत नसे. दानवांचा राजा वृत्रासुर याने देवांचा राजा इंद्र याला युद्धाचे आव्हान दिले. इंद्र आपले वज्र घेऊन युद्धास निघाला.

त्या वेळी इंद्राला विजय मिळावा म्हणून त्याची पत्नी शुची हिने विष्णूकडुन मिळालेला एक दोरा (राखी) इंद्राच्या हातावर बांधला. त्या राखीच्या प्रभावाने इंद्राला त्या युद्धात विजय मिळेल, अशी तिची श्रद्धा होती. शेवटी श्रध्दा खरी ठरली आणि इंद्राचा विजय झाला आणि त्याचे गेलेले वैभव परत मिळाले. या प्रसंगाची आठवण म्हणून मनगटावर राखी बांधण्याची पद्धत पडली, असे सांगितले जाते.

हिंदू पंचांगाप्रमाणे श्रावणात येणारी राखी पौर्णिमा ही नारळी पौर्णिमेच्या दिवशी किंवा पौर्णिमा लागोपाठ दोन दिवस असेल तर दुसऱ्या दिवशी असणाऱ्या पौर्णिमेला साजरी करतात. याच दिवसाला रक्षाबंधन म्हणतात.

या दिवशी रक्षाबंधनाचा कार्यक्रम असतो. हा सण बहीण भावाच्या अतूट, उत्कट प्रेमाची आठवण करून देणारा दिवस आहे. श्रावण पौर्णिमेस राखी बांधावी, असे धर्मशास्त्रात म्हणले आहे. या विधीस पवित्रारोपण असेही म्हणतात. भावाचा उत्कर्ष व्हावा, आपल्या भावाने आपले रक्षण करावे, ही यामागची मंगल मनोकामना असते.

उत्तर भारतात हा सण राखी म्हणून प्रसिद्ध आहे. या दिवशी बहिणी आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून भावास दीर्घ आयुष्य व सुख लाभो मिळो, अशी कामना करतात. राखी बांधण्याचा अर्थ ती बांधणाऱ्या व्यक्तीच्या प्रेमरूपी बंधनात स्वतःला गुंतवून त्या व्यक्तीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारणे.

राखी बांधण्याच्या या सणातून स्नेह व परस्परप्रेम वृद्धिंगत करण्याची प्रथा अस्तित्वात आली आहे. रक्षाबंधन म्हणजे हातातील राखीस साक्षी मानून आपल्या बहिणीचे सदैव रक्षण करण्याचे वचन देणे. काही प्रांतात नोकर आपल्या मालकाला, ब्राह्मण आपल्या यजमानाला, मुलगी आपल्या वडिलांना, आणि पत्नी नवऱ्याला राखी बांधते. आपल्यापेक्षा बलवान, समर्थ माणसाला राखी बांधून आपल्या रक्षणाचे वचन घेणे हीच यामागची भावना आहे.




भारतीय समाजात ऐक्य आणि प्रेमभाव वाढीस लागावा यासाठी रक्षाबंधनाचा सण राजपूत लोकांत रूढ झाला. आजकाल मात्र बहीण-भावाच्या पवित्र प्रेमाचा सण म्हणून हा सण साजरा होतो. या दिवशी बहिणी आपल्या सख्ख्या भावाच्या हातावर राखी बांधतातच आणि शिवाय त्या बंधुत्वसमान नाते असलेल्या व्यक्तीसही राखी बांधतात.



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

उत्तर भारतातील ग्रामीण भागांत जिथे अनेक खेड्यांमध्ये बहिर्विवाह पद्धती प्रचलित आहे, तिथे मोठ्या संख्येने विवाहित हिंदू स्त्रिया दरवर्षी त्यांच्या पालकांच्या घरी सणासाठी परत जातात. त्यांचे भाऊ, जे विशेषतः पालकांसोबत किंवा जवळपास राहतात, कधीकधी त्यांच्या बहिणींच्या विवाहित घरी त्यांना परत घेऊन आणण्यासाठी जातात.

अनेक तरुण विवाहित स्त्रिया त्यांच्या जन्माच्या घरी काही आठवड्यांपूर्वी येतात आणि समारंभ होईपर्यंत राहतात. भाऊ हे बहिणीचे सासर आणि माहेर यांच्यामध्ये आजीवन मध्यस्थ म्हणून काम करतात.

शहरी भारतात जिथे कुटुंबे अधिकाधिक विभक्त होत आहेत, तिथे हा सण अधिक प्रतीकात्मक बनला असला तरीही तो खूप लोकप्रिय आहे. या उत्सवाशी संबंधित विधी त्यांच्या पारंपारिक प्रदेशांच्या पलीकडे पसरले आहेत. तंत्रज्ञान, स्थलांतर, चित्रपट, सामाजिक संवाद, आणि हिंदू धर्माच्या राजकीय प्रचाराद्वारे या सणाचे स्वरूप बदलले जात आहे.

रक्ताचे नाते नसलेल्या स्त्रिया आणि पुरुषांमध्ये स्वैच्छिक नातेसंबंधांची एक बदललेली परंपरा देखील आहे. यासाठी जाती आणि वर्गाच्या पलीकडे, तसेच हिंदू आणि मुस्लिम हा भेद विसरून राखी बांधली जात आहे.

जैन परंपरेमध्ये सातशे मुनींवर दृष्ट प्रवृत्तीने केलेल्या उपसर्गाला दुर करण्याचे कार्य या पर्वमध्ये झाले. जैन लोक रक्षाबंधनाच्या दिवशी जैन मंदिरात जाऊन अभिषेक-पूजन करुन मुनीं प्रती हृदयभाव ठेवून पंडित-पुजाऱ्यांच्या हस्ते राखी बांधून हे पर्व साजरे करतात. धर्मरक्षणाचे चकं कण आहे ते !

प्रथम धार्मीक व नंतर सामाजिक दायित्व पार पाडले जाते. हे पर्वधर्म व धर्मावलय यांच्येशी मातृत्व भावनेतून जोडणारे आहे. संस्कृती व धर्म समर्पणाच्या भावनेला वृध्दिगत करणारे आहे. श्रमण संस्कृतिमध्ये रक्षाबंधनाचे आगळे वेगळे वैशिष्ट्य आहे. ईश्वरप्रती समर्पणाची भावना व संस्कृतिचा अत्यंत आदरया भावनांना श्रेष्ठस्थान दिले गेले आहे.

सामाजिक दृष्टिकोनातून रक्षाबंधन हे वात्सल्य व बंधुभावाचे परिपाक पर्व आहे. बंधुभाव व स्नेहवर्धनाचे पाठया पवार्मुळे गिरविले जातात. समाज व धर्म या पेक्षाश्रेष्ठ आहे राष्ट्रधर्म ! म्हणून सामाजिक व धार्मीक अस्तित्व टिकविण्याची आज राष्ट्राचे अस्तित्व टिकविण्याची, त्याचे जतन करण्याची गरजभासत आहे. ही महान जबाबदारी आज आपणांवर आहे. ती नेटाने करणे गरजेचे आहे, त्यामुळेही घडी नीट घट्ट बसेल.

आलमगीर बादशहा दिल्लीवर राज्य करीत होता. त्याच्या प्रधानाने कट आखून बादशहाचा खून केला व प्रेत नदीत टाकून दिले. एका स्त्रिने ते पाहिले. प्रेत वाहून जाऊ नये म्हणून तिने प्रेत पाण्याबाहेर काढले आणि प्रेताचा वाली येईपर्यंत प्रेताजवळ बसून राहिली. बऱ्याच वेळानंतर बादशहाच्या शोधात सैनिक तेथे आले. बादशहाचा मुलगा शहाआलम याने त्या हिंदू स्त्रीचे आभार मानले. तिला आपली बहीण मानले. ती हिंदू स्त्री पुढे दरवर्षी शहाआलमला राखी बांधू लागली. ही प्रथा पुढे अकबरशहा व बहादूरशहा यांनीही चालू ठेवली. इतिहासात याचा उल्लेख आहे. मुघल बादशहानी पवित्र मानलेला हिंदूंचा हा एकमेव सण आहे.

या श्रावण पौर्णिमेला पोवती पौर्णिमा असेही म्हणतात. कापसाच्या सुताच्या नवसुती (नऊ धाग्यांची जुडी) करून तिला आठ-बारा किंवा चोवीस गाठी मारतात व त्यांच्या ठिकाणी ब्रह्मा, विष्णू, महेश, ओंकार, सूर्य इत्यादी देवतांचे आवाहन करून हे पोवते प्रथम देवास वाहून नंतर तसलीच पोवती कुटुंबातील माणसांच्या मनगटावर बांधली जातात.

रक्षाबंधनाच्या निमीत्ताने पर्यावरणाचे रक्षण, ऑलिम्पिक खेळाडूंना शुभेच्छा आणि स्त्रीभ्रूणहत्या रोखण्याचा संदेश राखीच्या माध्यमातून करण्याचा निर्धार भाऊ-बहिण आणि समस्त भारतीयांनी या नाजुक पर्वावर केला पाहिजे. रक्षाबंधन निमित्त सर्व बंधु-भगिनींना मनःपूर्वक शुभेच्छा!

## रक्षाबंधनाचे आध्यात्मिक वैशिष्ट्य!

अध्यात्मशास्त्रानुसार जीवांमधील देवाण घेवाण हिशोब संपवून ईश्वरप्राप्ती करून घेण्यासाठी आत्म्याला मानवी जन्म लाभतो. मात्र मानवी जन्मात केलेल्या चांगल्या वाईट कमार्मुळे त्याला पाप-पुण्य लाभते आणि त्याचे फळ भोगण्यासाठी त्याला पुन्हा पुन्हा जन्म घ्यावा लागतो. मानवी जन्मात मिळणारे नातेवाईक, आप्तेष्ट, शेजारी-पाजारी, मित्र मंडळी हा सर्व गोतावळा आपल्याभोवती निर्माण होण्यामागे त्यांच्याशी गेल्या अनेक जन्मांचे आपल्याशी असलेले देवाण घेवाण हिशोब पूर्ण करणे हेच कारण असते.

बहीण-भावाचे नाते निर्माण होण्यामागेही हेच कारण आहे. रक्षाबंधन आणि भाऊबीज या सणांमागे पौराणिक कथांचा आधार असला तरी या दोघांतील देवाण घेवाणीचा हिशोब पूर्ण करण्यासाठीच रक्षाबंधन, भाऊबीज या सणांची निर्मिती झाली आहे. स्थूल रूपाने रक्षाबंधन हे जरी बंधन वाटत असले, तरी सूक्ष्म रूपाने वर्षागणिक हा हिशोब पूर्ण होत असतो. त्यामुळे ही संधी बहीण आणि भावाने सोडू नये असे म्हटले जाते. हल्ली रक्षाबंधनाच्या दिवशी भाऊ आपल्याला काय भेटवस्तू देणार याकडे बहिणीचे विशेष लक्ष असते. आध्यात्मिकदृष्ट्या बहिणीने मनात अशी अपेक्षा बाळगल्यास तिला त्याचा अध्यात्मिक लाभ होत नाही. त्यामुळे रक्षाबंधन हे निरपेक्ष भावानेच साजरे व्हायला हवे.

■ नरेश घरत, चेंबूर

## तेच खरे रक्षाबंधन !

रक्षाबंधनाच्या दिवशी बहीण आपल्या भावाला राखी बांधून त्याच्याकडून तिच्या रक्षणाचे वचन घेते. त्रेतायुगापासून सुरु असलेल्या या प्रथेला बंधू भगिनीतील प्रेमाची झालर आहे. काळ बदलला तशी स्त्री अधिकाधिक असुरक्षित होत गेली आहे. आज स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटना प्रतिदिन आपल्याला वर्तमानपत्रांतून वाचायला मिळतात. गेल्या दहा वर्षांत स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. कोणत्याही स्त्रीवर प्रतिकूल प्रसंग कधी ओढवेल, ही वेळ सांगून येत नाही.

अशा प्रत्येक कठीण प्रसंगी आपला भाऊ आपले रक्षण करण्याकरिता धावून येईलच असे नाही. यासाठी प्रत्येक स्त्रीने प्रतिकूल प्रसंगात आपले रक्षण कसे करावे, याचे सामान्य प्रशिक्षण घेणे अत्यावश्यक आहे. स्व संरक्षण प्रशिक्षणाने केवळ शारीरिक नव्हे, तर मानसिक बळही वाढते. आजची स्त्री भौतिकदृष्ट्या उत्तुंग शिखरे पादाक्रांत करत आहे; मात्र समाजाची ढासळलेली नीतिमत्ता तिचे खच्चीकरण करू पाहत आहे. अशा समाजाला तोंड देण्यासाठी मन आणि शरीर सामर्थ्यवान करण्याची आज नितांत गरज आहे, रक्षाबंधनाच्या दिवशी जेव्हा प्रत्येक स्त्री आपल्या भावाला अभिमानाने सांगेल, कि माझे रक्षण मी स्वतः करू शकते, ते रक्षाबंधन खरे रक्षाबंधन असेल.

**सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई.**

## राखीचं खरं मोल प्रेम, कर्तव्य आणि संस्कार

रक्षाबंधन हा सण श्रावण पौर्णिमा या तिथीला साजरा केला जातो. या वर्षी ही तिथी ९ ऑगस्ट २०२५ या दिवशी आहे. बहीण आपल्या भावाचे औक्षण करून त्याला प्रेमाचे प्रतीक म्हणून राखी बांधते. भाऊ आपल्या बहिणीला ओवाळणी म्हणून भेटवस्तू देऊन तिला आशीर्वाद देतो. राखी बांधण्यामागे भावाचा उत्कर्ष व्हावा आणि भावाने बहिणीचे संरक्षण करावे, ही भूमिका असते.

रक्षाबंधन या सणाच्या माध्यमातून ज्याप्रमाणे भाऊ आणि बहीण यांच्यातील प्रेम व्यक्त केले जाते, त्याचप्रमाणे त्यांच्यातील देवाण-घेवाणही न्यून होत असतो. त्यामुळे हा सण भाऊ आणि बहीण या दोघांना ईश्वराकडे घेऊन जाणारा ठरतो.

रक्षाबंधन हे एक नात्यांचं, प्रेमाचं, आणि कर्तव्यभावनेचं प्रतिक आहे. पूर्वीच्या काळात या सणामध्ये भावंडांमध्ये केवळ गोड बोलचाल नव्हती, तर त्यात कर्तव्याची जाणीव होती, सुरक्षेचं आश्वासन होतं, आणि निरपेक्ष प्रेम असायचं. आजच्या काळात, हा सण साजरा होतो पण त्यामागचं खरं महत्व, त्याची भावनात्मक खोली ही कुठेतरी लुप्त होतेय. राखीचा सण म्हणजे आता फॅन्सी वस्तू, गिफ्ट्स, किंवा पैशांची अपेक्षा असे व्यापारी स्वरूप घेत आहे.

महाभारतात द्रौपदीने श्रीकृष्णाच्या हाताला राखी बांधली होती, आणि कृष्णाने तिचे रक्षण केले होते. यावरुन आपल्याला लक्षात येते की रक्षाबंधन हे स्त्रीच्या असुरक्षिततेवर नव्हे, तर स्त्रीच्या विश्वासावर आधारित सण आहे.

रक्षाबंधनाचा मूळ हेतू हा केवळ भावाला राखी बांधण्यापुरता मर्यादित नाही, तर रक्षणाचे कर्तव्य, भावना ही रक्ताच्या नात्यांपेक्षा मोठी असते याची जाणीव करून देणारा आहे .

**कु. राधा प्रमोद पिंपळापुरे**
**उमरेड**

म्हणजेच स्वतः सक्षम व्हायचे आणि इतरांचेही रक्षण करायचे. आज राखी चे स्वरूप बदलत चालले आहे. जेवढी मोठी भेट तेवढ जास्त प्रेम.

इथेही नात्यामधल्या ओलाव्यापेक्षा व्यावहारिक स्वरूप आले आहे. भावांनी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की आज आपल्या बहिणी असुरक्षित आहेत. त्यांचे संरक्षण करणे, त्यांना मानसिक आधारासोबतच स्वसंरक्षण प्रशिक्षण देणे आज काळाची गरज बनली आहे. आणि हीच खरी राखीची भेट ठरणार आहे.

आई-वडिलांनीही मुलांवर असे संस्कार लहानपणापासूनच रुजवायला हवेत. रक्षाबंधन हे प्रेम, कर्तव्य आणि नात्याची जाणीव करून देणारा , सामाजिक बांधिलकी जपणारा सण आहे . केवळ आपली बहीणच नव्हे, तर समाजातील स्त्रियांचे ही रक्षण करण्याची जबाबदारी भावाच्या मनगटात आहे. हाच बहिणीने भावांना राखी बांधण्यामागील खरा उद्देश आणि हिच खरी भेट.

आपण सण साजरे करतो त्या मागचं सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक मूल्य आपण पुढच्या पिढीला शिकवायला पाहिजे. रक्षाबंधन हा एक दिवसापुरता सण न राहता तो समाजमनाचा संस्कार बनेल. चला तर मग आज आपण संकल्प करूया सण साजरे करायचे पण त्याचं मोल समजून. नातं जपायचं पण त्यात प्रेम, समर्पण आणि जबाबदारी जाणून.

■ ■ ■



## सण 'रक्षाबंधनाचा'

सण उत्साह-आनंदाचा,
नारळीपौर्णिमा - रक्षाबंधनाचा,
बहिण-भावाच्या पवित्र नात्याचा
प्रेमाच्या देवाण-घेवाणीचा

हतावर साज चढला,
रंगी-बेरंगी राख्यांचा....
राखी - नारळ - मिठाई,
दिव्याने रंग वाढला तबकाचा

टिळा लावूनी ओवाळीते
मान आज हा भावाचा,
राखी बांधुनी पेढा भरविते
घास असे हा प्रेमाचा....

लाभो तुला दीघार्युष्य
मिळो आशीर्वाद ईश्वराचा
राहो संकटे तुझ्यापासून दूर
एकची ध्यास तुज्या बहिणीचा

नको काही भेटवस्तू
नको दागिना सोन्या-चांदीचा
आठवण तुला सदा राहावी
क्षण असो सुखाचा वा दुःखाचा

तुझ्यासारखा भाऊ लाभला
भाग माज्या पूर्वपुण्याईचा
असेच राहावे नाते आपुले
करार हा जन्मोजन्मीचा

करुया सण साजरा रक्षाबंधनाचा
बहिण-भावाच्या पवित्र नात्याचा....!

**ज्योती रावराणे**
**कांजूरमार्ग, मुंबई.**

# रक्षाबंधन बहिण-भावांचे पवित्र नाते

रक्षाबंधन हा सण बहिण-भावाचा सण म्हणून ओळखला जातो. राखीचा धागा साधासुधा नसुन अतुट बंधन आहे.भारतात सर्वच जातीधर्माचे लोक रक्षाबंधन मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा करतात. यात भावाने बहिणीला दिलेले वचन अत्यंत महत्त्वाचे असते. पंचागानुसार श्रावण महिन्यातील म्हणजे राखी पौर्णिमा याला नारळी पौर्णिमा सुध्दा म्हणतात.

भारतात संपूर्ण राज्यात राखी पौर्णिमा वेगवेगळ्या पध्दतीने साजरी केली जाते. उत्तर भारतात कजरी पौर्णिमा,पश्चिम भारतामध्येनारळी पौर्णिमाया नावाने हा सण साजरा केला जातो. पुराणात सांगितल्याप्रमाणे श्रावण पौर्णिमेला मोठ्यांचे आशीर्वाद पवित्र मानल्या जाते. पुर्वी मध्ययुगीन काळात भारतामध्ये बाहेरील आक्रमणापासून महिलांचे संरक्षण करण्यासाठी हा सण साजरा करण्यात येत असे. महाभारतात सुध्दा बहिणभावाचे अतुट बंधन दिसून येते.

रक्षाबंधनाची परंपरा दैवी काळापासून तर आजपर्यंत आजतागायत सुरू आहे. चित्तोढगडची राणी कर्मावती हिने बहादुरशहा पासून आपली रक्षा करण्यासाठी मुघल बादशहा हुमायूला राखी बांधली होती. राखी बांधल्यानंतर राजा हुमायूने राणी कर्मावतीच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची बाजी लावली असे सांगण्यात येते.

यावरून स्पष्ट होते की भाऊ आपल्या बहिणीच्या रक्षणासाठी प्राण जाये पर वचन न जाये अशी भूमिका बहिणीबद्दल भावांमध्ये दिसून येते. सध्या बहिण - भावाप्रमाणे आज वृक्षांना आपल्या बंधनात बांधण्याची नितांत गरज आहे. कारण वृक्ष रहाली तर जमीन (पृथ्वी) राहील, पृथ्वी शाबूत रहाली,तर मानव व संपूर्ण जीवजंतू आणि सृष्टी सुरक्षित राहील.

दिवसेंदिवस वृक्षतोडीमुळे पृथ्वी डगमगायला लागली आहे यामुळे भूस्खलन, भूकंप, सुनामी, ज्वालामुखीचा उद्रेक,अती थंडी,अती उष्णता, अती पाऊस अशाप्रकारच्या कधीच न घडलेल्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत याकरीता पृथ्वीला वाचविण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर असल्यामुळे जास्तीत जास्त वृक्षारोपण अती आवश्यक आहे.

बहिणीने भावाला राखी अवश्य बांधावी. परंतु सोबतच एक वृक्ष भेट देऊन त्यांची जोपासना करण्याचे वचनसुध्दा घ्यावे.



रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

दिवसेंदिवस हवामानात बदल होत असून, अनेक पशुपक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे व काही पशुपक्षी व वृक्ष लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. पुर्वी मुसळधार व संथ गतीने पाऊस यायचा. परंतु बदलत्या हवामानामुळे मुसळधार पाऊसाचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते व यामुळे ढगफुटीचे व सुनामीचे प्रमाण सुध्दा वाढले आहे.

यामुळे मानवी हानी, शेतीचे नुकसान, वित्तीय हानी, समुद्राच्या पातळीत वाढ, सुनामी, भुकंप, वादळ, विज कोसळणे, अती उष्णता, अती थंडी ह्या संपूर्ण भयावह घटना निसर्गाचे संतुलन डगमगल्याने निर्माण झाल्याचे दिसून येते.

मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे येणाऱ्या संकटांशी सामना अवश्य करू शकतो. याकरीता रक्षाबंधनाच्या निमित्ताने संपूर्ण भारतात वृक्षारोपण व्हायला हवे. बहिणीने भावाला किंवा भावाने बहिणीला काय मौल्यवान वस्तू भेट द्यायच्या आहेत त्या अवश्य द्याव्यात. परंतु बहिणीने भावाला व भावाने बहिणीला एक -एक वृक्ष भेट देऊन धरतीमातेचे रक्षण करण्याचा संकल्प सर्वांनीच घेतला पाहिजे.

यामुळे संपूर्ण भारतात हिरवागार गालिचा निर्माण होईल. येणारे पाऊसाचे पाणी जमिनीत मुरेल व पृथ्वीचे संतुलन सुरक्षित राहील, ग्लेशियर वितळणे थांबेल, वणव्याचे प्रमाण कमी होईल, भुकंपावर आळा बसेल, अशाप्रकारे निसर्गावर येणारे संकट वृक्षलागवडीमुळे हळूहळू कमी होण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित होईल.

वृक्षलागवड सांस्कृतिक, सामाजिक, सण उत्सव, राष्ट्रीय कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय कार्यक्रम अशा कोणत्याही मागार्ने होने अत्यंत गरजेचे आहे. कारण यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थीर रहाण्यास मोठी मदत होईल व हवामानातील वाढता बदल यावर अंकुश लावण्यास सर्वांचा हातभार कामी येईल. त्यामुळे रक्षाबंधनाचे औचित्य साधून बहिण-भावाने वृक्ष भेटीवर जास्तीत जास्त भर देण्याची गरज आहे. सरकारने राज्यात लाडकी बहिण योजना अंमलात आणली याचे मनापासून स्वागतच अशा प्रकारच्या योजना अंमलात आणल्यानंतर प्रत्येकांना सरकारने एक-एक वृक्ष भेट देऊन पर्यावरण वाचविण्याच्या बंधनात सहभागी केले पाहिजे. अशी अपेक्षा या सणनिमित्त करण्यास हरकत नाही.

■ ■ ■

# पातूरच्या कावड यात्रेवर काळाचा घाला
# अपघातात दोन शिवभक्तांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
पातूर/अकोला, दि. ८ :
पातूर शहरातून काशी विश्वनाथ ते कवळेश्वर पातूर अशी जलकावड घेऊन निघालेल्या पायी यात्रेवर सिवनी जिल्ह्यात काळाने घाला घातला.

शुक्रवार, ८ ऑगस्ट रोजी मध्यरात्रीच्या सुमारास मध्य प्रदेशातील सिवनी जिल्ह्यातील बांदल पोलीस स्टेशनच्या हद्दीत एका अज्ञात वाहनाने पायी चालणाऱ्या शिवभक्तांना आणि भाविकांनी भरलेल्या ट्रॅक्टरला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात पातूर येथील दोन शिवभक्तांचा जागीच मृत्यू झाला असून नऊ जण गंभीर जखमी झाले आहेत.

२२ जुलै रोजी जय तपे हनुमान व्यायाम शाळा, पातूरच्यावतिने या कावड यात्रेचा श्रीगणेशा झाला होता. पातूर येथील तपे हनुमान मंदिरापासून सुरू झालेली यात्रा सायंकाळी वीर संभाजी महाराज चौकात फटाक्यांच्या आतषबाजीने, ढोल-ताशांच्या गजरात आणि उत्साही वातावरणात रवाना झाली होती.

ही पारंपरिक पायी कावड यात्रा दरवर्षीप्रमाणे यंदाही काशी विश्वनाथ येथून पवित्र जल आणून काशी कवळेश्वर (पातूर) येथे अभिषेक करण्यासाठी निघाली होती. यात्रेचे संपूर्ण नेतृत्व अतुल पंचायत समितीचे माजी सभापती आणि शिवसेना (शिंदे गट)चे पातूर तालुका प्रमुख बाळू भाऊ ऊर्फ अनंता बगाडे यांनी केले होते. १८ ऑगस्ट रोजी या यात्रेचे पातूरमध्ये आगमन होणार होते.

दरम्यान, मध्य प्रदेशातील सिवनी जिल्ह्यातील एका गावाजवळ, भाविकांचा ट्रॅक्टर आणि त्यामागून चालणाऱ्या कावडधारकांना भरधाव अज्ञात वाहनाने पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात बंडू पांडुरंग बंड, रा. गुरुवार पेठ, पातुर आणि अविनाश रमेश पोहरे, रा. नानासाहेब नगर, पातूर यांचा जागीच मृत्यू झाला. हे त्यांच्या मृत्यूने पातूर शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

या अपघातात इतर नऊ शिवभक्त जखमी झाले आहेत. त्यांच्यावर सिवनी येथील शासकीय रुग्णालयात तातडीने उपचार सुरू करण्यात आले आहेत. काही भाविकांची प्रकृती चिंताजनक असून, त्यांच्या पुढील उपचारासाठी विशेष वैद्यकीय पथक नियुक्त करण्यात आले आहे. स्थानिक पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, अपघातास कारणीभूत ठरलेल्या अज्ञात वाहनाचा शोध सुरू आहे.

अपघाताची माहिती मिळताच पातूर शहरात शोककळा पसरली. जय तपे हनुमान व्यायाम शाळेच्या वतीने मृत शिवभक्तांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. विविध सामाजिक संघटना, शिवभक्त मंडळे आणि पातूरमधील नागरिकांनी एकत्र येत या अपघातात मृत झालेल्या भाविकांच्या कुटुंबीयांना आर्थिक व मानसिक आधार देण्याचे आवाहन केले आहे.

या अपघातामुळे भविष्यातील यात्रांसाठी सुरक्षिततेबाबत योग्य ती काळजी घेणे, यंत्रणांची साथ मिळवणे आणि प्रशासनाच्या मदतीने नियोजनबद्ध व्यवस्था उभी करणे, याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. यासोबतच, जखमी भाविकांच्या उपचारासाठी शासनाने तातडीने मदतीचे पाऊल उचलावे, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.


९ जखमी

# ९० हजारावर शेतकऱ्यांना मिळणार
# ७४ कोटींची आर्थिक मदत

केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या पाठपुराव्याला यश



■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. ८ :
बुलढाणा जिल्हयात 25 आणि 26 जून रोजी ढगफुटी सदृश्य पावसामुळे जिल्ह्यातील आठ मंडळ क्षेत्रामधील 87 हजार 390.2 हेक्टर पिकांचे नुकसान झाले होते. केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केलेल्या पाठ पुराव्याला यश आले असून सरकारने बाधित शेतकऱ्यांसाठी 74 कोटी 45 लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर केली आहे

बुलढाणा लोकसभा मतदारसंघात 25 व 26 जून रोजी ढगफुटीसदृश्य व अतिवृष्टीमुळे 87 हजार 390.2 हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले होते 90 हजार 383 शेतकऱ्यांना या अतिवृष्टीचा फटका बसला होता. अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी धीर देत शासनाकडून तात्काळ मदत मिळवून देण्याची ग्वाही दिली होती.

यावेळी माजी आमदार संजय रायमुलकर होते. त्यानंतर केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री आजित पवार व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली व शेतकऱ्यांच्या नुकसानीबाबतची दाहकता आणि फोटोग्राफ दाखवून त्यांच्या लक्षात आणून दिली. तसेच या शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याची मागणी केली होती.

शासनाने 6 ऑगस्ट रोजी परीपत्रक काढून बुलढाणा जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांसाठी 74 कोटी 45 लाख रुपयांची नुकसान भरपाई मंजूर केली आहे.

बुलडाणा जिल्ह्यातील मेहकर मतदारसंघात सरासरी 112 मिमी पावसाची नोद झाली होती यामध्ये मेहकर मतदारसंघातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते त्यांना तब्बल 66 कोटींची नुकसान भरपाई मिळणार आहे. मेहकर मतदारसंघातील 65,601 हेक्टर शेती क्षेत्र बाधित झाले असून 66 हजार नुकसानग्रस्त शेतकरी मदतीसाठी पात्र ठरले आहेत.

यामध्ये जमीन खरडून जाणे, फळबागांचे नुकसान आणि गाळ साचल्यामुळे पीक नष्ट होणाऱ्या सुमारे 6 हजार शेतकऱ्यांचाही समावेश करण्यात आला आहे. या तातडीच्या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री आजित पवार व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार व्यक्त करत मतदारांना दिलेला शब्द पाळला असल्याच्या प्रतिक्रिया केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव व माजी आमदार संजय रायमुलकर यांनी व्यक्त केल्या असून शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत जाहीर झाल्याबद्दल शेतकऱ्यांनीही समाधान व्यक्त केले आहे.

## सगळे प्रयत्न संपले म्हणजे जनता आठवते, सरसंघचालकांचा निशाणा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :
सरसंघचालक मोहन भागवत यांनी शुक्रवारी पुन्हा एकदा अप्रत्यक्षपणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला आहे. सगळे प्रयत्न संपले म्हणजे लोक सर्वसामान्य जनतेकडे जातात. जनतेच्या मनात आले तर कामेही होता. पण जगात परिवर्तन होत आहे. हे ओळखून योग्य पाऊले टाकली नाही तर विनाश होईल, असे ते म्हणालेत. भागवत यांनी नागपूर येथील श्री पाण्डुरंगेश्वर शिव मंदिरात आयोजित एका कार्यक्रमात बोलताना उपरोक्त विधान केले आहे.

शिव हे सर्वसामान्यांचे प्रतीक

सरसंघचालक म्हणाले, श्रावण महिन्यात सर्वजण महादेवाची भक्ती करतात. महादेव हे सर्वसामान्य जनतेचे प्रतीक आहे. सर्व प्रयत्न संपले की लोकही सामान्य जनतेकडे जातात. जनतेच्या मनात आले तर कामेही होतात. पण जगात परिवर्तन येत असल्याचे बुद्धिवादी म्हणत आहेत. हे ओळखून मनुष्याने योग्य पाऊले टाकली नाही, तर विनाश अटळ आहे. त्यामुळे काळ ओळखला तर नवीन उन्नत समाज उभा राहील.



माणसाच्या हावरटपणामुळे आज संकटे येत आहेत. त्याच्यातील कट्टरपणामुळे राग, द्वेष वाढत आहे. लढाया होत आहेत. सर्वकाही मलाच मिळावे, बाकीच्यांना मिळाले नसले तरी चालेल अशी स्वार्थी वृत्ती वाढत आहे. मनुष्याची ही काळी बाजू आहे. ही वृत्ती बदलण्याची गरज आहे. शिवाजे पूजन करणे म्हणजे ही वृत्ती बदलणे होय. मला काही नको, साधे राहणीमान व करुणा हा भाव प्रत्येक असणे आवश्यक आहे.

आपला उपयोग जगासाठी अधिक व्हावा अशी वृत्ती म्हणजे शिववृत्ती आहे. असे पवित्र जीवन आपल्याला जगण्याची गरज आहे, भगवान शंकरात फार मोठे सामर्थ्य आहे. मनुष्याला देवापर्यंत पोहोचवण्याचा मार्ग शंकरापासून निघतो. पण एवढे सामर्थ्य असूनही शिव वैराग्य वृत्तीचे आहेत. सध्या आपल्यालाच काहीतरी मिळावे ही प्रवृत्ती वाढली आहे. पण हा शंकराचा स्वभाव नाही, असे ते म्हणाले.

## भाजपकडून मला अडकवण्याचा डाव

रोहित पवारांचे सीएमकडे बोट

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ८ :
भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी आपल्या कार्यकर्त्याला झालेल्या मारहाणीप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. रोहित पवार हेच या मारहाणीचे मास्टरमाईंड आहेत. त्यांनी स्वतः व्हिडिओ कॉलवरून ही मारहाण पाहिली, असे ते म्हणालेत.



दरम्यान, रोहित पवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांच्या इशाऱ्यानुसारच पडळकर सोलापुरात जाऊन तमाशा करत असल्याचा पलटवार केला. मी माझ्या कुटुंबाशीही व्हिडिओ कॉलवर बोलत नाही, हा कोण लागून गेला, असेही ते यावेळी म्हणाले.

गोपीचंद पडळकर यांच्या सोलापूर येथील शरणू हांडे नामक एका कार्यकर्त्याला फिल्मी स्टाईलने अपहरण करून मारहाण करण्यात आली आहे. या प्रकरणी राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या अमित सुरवसे नामक कार्यकर्त्याला त्याच्या सहकाऱ्यासह अटक करण्यात आली आहे. पडळकरांनी पत्रकारांशी बोलताना त्यांनी रोहित पवार हेच या मारहाणीचे मास्टरमाईंड असल्याचा आरोप करत त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. या पार्श्वभूमीवर रोहित पवार यांनी हा आपल्याला अडकवण्याचा डाव असल्याचा दावा केला आहे.

रोहित पवार अमरावतीत पत्रकारांशी बोलताना म्हणाले, मी सध्या सरकारविरोधात आवाज उठवत आहे. मी पुराव्यांसह बोलत असल्यामुळे सरकारची अडचण होत आहे आणि मी ती केलेली आहे. मी काल त्यांना व्हिडिओ कॉल केल्याचा आरोप ते करत आहेत. पण मी काल छत्रपती संभाजीनगर येथे होतो. त्यानंतर वाशिम व आज अमरावतीला आलो. मी अजून कुठेही कुणाशी फोनवर संवाद साधला नाही. ते माज्यावर व्हिडिओ कॉलवर बोलल्याचा आरोप करत आहेत. पण मी माज्या घरच्यांशीही व्हिडिओ कॉलवर बोलत नाही. मग हा कोण लागून गेला?

राहिला प्रश्न ही मारहाण करणाऱ्या कार्यकर्त्याचा तर जो व्यक्ती कायदा सुव्यवस्था हातात घेतो, त्याच्या बाजूने आम्ही केव्हाच उभे राहत नाही. त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे. हा तमाशा करून मला अडकवण्याचा प्रयत्न करत असाल तर एसआयटी चौकशी करा. मी स्वतः त्याची मागणी करतो. चौकशी करा. खरे काय ते लोकांपुढे आले पाहिजे, असेही आमदार रोहित पवार यावेळी बोलताना म्हणाले.

## नागपूर - पुणे वंदे भारत एक्सप्रेसचा रविवारी अजनी स्थानकातून शुभारंभ



पीएम मोदी करणार ऑनलाईन उद्घाटन

पहिल्या दिवशी मोफत प्रवास

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नागपूर (अजनी) ते पुणे वंदे भारत एक्सप्रेसचा शुभारंभ येत्या रविवार १० ऑगस्ट रोजी ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. सकाळी ९ वाजता नागपूर रेल्वे स्थानकावर आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान मोदी ऑनलाईन उपस्थित राहणार असून, याच कार्यक्रमात बेंगळुरू-बेळगावी आणि श्री माता वैष्णोदेवी कटरा-अमृतसर वंदे भारत एक्सप्रेस सेवांचाही प्रारंभ होईल.

नागपूर रेल्वे स्थानकावरून ही तिसरी वंदे भारत एक्सप्रेस सेवा असेल. यापूर्वी नागपूर-बिलासपूर आणि नागपूर-सिकंदराबाद या दोन वंदे भारत एक्सप्रेस सेवा सुरू आहेत. नागपूर-पुणे मार्गावर वंदे भारत एक्सप्रेस सुरू करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होत होती. ही सेमी-हायस्पीड एसी चेअर कार सेवा सुरू झाल्याने नागपूर व पुणे दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

नवीन वंदे भारत एक्सप्रेस अजनी (नागपूर) येथून सकाळी ९.५० वाजता सुटेल आणि रात्री ९.५० वाजता पुण्याला पोहोचेल. आठवड्यातून सहा दिवस ही सेवा सुरू राहील. सोमवारी नागपूरहून ट्रेन चालणार नाही. पुण्याहून ही ट्रेन सकाळी ६.२५ वाजता सुटून, संध्याकाळी ६.२५ वाजता अजनीला पोहोचेल. या गाडीचे थांबे वर्धा, बडनेरा, अकोला, शेगाव, भुसावळ, जळगाव, मनमाड, कोपरगाव, अहमदनगर, दौंड हे आहेत.

प्रकार आणि भाडेप्रवाशांच्या दीर्घकालीन मागणीनुसार ही ट्रेन स्लीपर वंदे भारत असावी अशी अपेक्षा होती. मात्र, सध्या ही सेवा एसी चेअर कार आणि एक्झिक्युटिव्ह एसी चेअर कार स्वरूपात सुरू करण्यात येत आहे. एसी चेअर कारचे भाडे सुमारे १५०० रुपये आणि एसी एक्झिक्युटिव्ह चेअर कारचे भाडे ३५०० रुपये असेल. नियमित सेवा १४ ऑगस्टपासून सुरू राहील.

## : साप्ताहिक संवाद :
## शुध्द हवा आणि पर्यावरण रक्षणासाठी..

लोकरंग

जगभरातील प्रगत देशांमध्ये सुरु असलेल्या विकासाच्या भयानक वेगामुळे वेगवेगळ्या प्रकारचे प्रदूषण मोठ्या प्रमाणत वाढीस लागत आहे. कार्बनचे मोठ्या प्रमाणात होणारे उत्सर्जन आणि त्यामुळे जागतिक तापमान वाढीचा होत असलेला उद्रेक याच पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय न्यायालयाने हवामान बदलासंदर्भात ऐतिहासिक निकाल दिलेला आहे. जागतिक हवामान संकटावर श्रीमंत देशांची कायदेशीर जबाबदारी निश्चित केल्यामुळे या निकालाला अत्यंत महत्व आहे. याच अनुषंगाने पर्यावरण अभ्यासक हृषीकेश पाटील यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**आंतरराष्ट्रीय न्यायालयाने हवामान बदलासंदर्भात जो निकाल दिलेला आहे त्यात महत्वाचे कोणते मुद्दे आहेत?**

यानिर्णयात न्यायालयाने अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडले. प्रथम, पॅरिस करारात सहभागी देशांनी जागतिक तापमानवाढ १.५ अंश सेल्सिअसपर्यंत मपदित ठेवण्यात योग्य उपाययोजना करणे बंधनकारक आहे.

दुसरे प्रत्येक देशाने आपल्या राष्ट्रीय स्लएका निश्चित केलेल्या योगदानाची पूर्तता करणे आवश्यक आहे. न्यायालयाने हे देखील स्पष्ट केले कि, हरितगृह वायूंच्या उत्सर्जनामुळे हवामान प्रणालीला होणाऱ्या हानीसाठी देश जबाबदार धरले जाऊ शकतात. इंधनाचे उत्पादन वापर त्याच्या उत्खननासठी परवाने देणे किंवा अनुदान देणे यासारख्या कृतीमुळे हवामान बदल रोखण्यात अपयश आल्यास आता आंतरराष्ट्रीय कायद्याचे उत्पन तरू शकते. विशेष म्हणने न्यायालयाच्या इतिहासात केवळ पाचव्यांदा सर्व न्यायाधीशांनी एकमताने निर्णय दिला आहे. या प्रक्रियेत तब्बल १६९१ अंतरराष्ट्रीय संस्थांनने भाग घेतला,

**पर्यावरण आणि हवा शुद्धतेसाठी श्रीमंत देशांच्या जबाबदाऱ्या काय?**

या निकालानुसार श्रीमंत देशांवर जबाबदाऱ्यांचा विशेष भर देण्यात आला आहे. UNFCCC च्या पष्टिशिष्ट १ मध्ये नमूद देशांवर हवामान बदलाविरुद्धच्या लढ्यात पुढाकार घेण्याची अतिरिक्त जबाबदारी आहे. विकसित देशांच्या यादीमध्ये अमेरिका, ब्रिटन, कॅनडा जर्मनी ऑस्ट्रेलिया आणि इतर विकसित राष्ट्राचा समावेश आहे, या राष्ट्रांनी केवळ आपले हरितगृह वायू उत्सर्जन मर्यादित करणेच नव्हे तर हरितगृह वायू शोषक अणि संपकांमध्ये वाढ करणे देखील आवश्यक आहे. न्यायालयाने या श्रीमंत राष्ट्रांवर आर्थिक सहाय तंत्रज्ञान हस्तांतरण आणि क्षमता निर्माण याच्या माध्यमातून विकसनशील देशांना मदत करण्याची बंधनकारक जबाबदारीही निश्चित केली आहे.

ही सर्व सहकार्य सद्भावनेने करणे अनिवार्य आहे. केवळ कागदोपत्री आश्वासने न देता आता प्रत्यक्ष कृती करणे आवश्यक आहे. ही मदत कर्जाच्या रूपात देण्याची जी प्रथा देशांकडून चालू होती, त्यावरही आळा बसेल अशी आशा आहे.

**भारतासाठी या निकालाचे महत्त्व काय?**

भारतासाठी हा निकाल अनेक दृष्टीने महत्वाचा आहे. जगातील तिसरा सर्वाधिक कार्बन उत्सर्जक देश असूनही, भारताचे दरडोई उत्सर्जन विकसित देशांच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. न्यायालयाने 'समान पण भिन्न जबाबदाऱ्या आणि संबंधित क्षमता या तत्त्वाला दिलेल्या महत्त्वामुळे भारतात विकासात्मक गरजा आणि हवामान कृती यांचा समतोल साधण्यास मदत मिळेलच.

विशेष म्हणजे, भारताला आता विकसित देशांकडून हवामान वित्त, स्वच्छ तंत्रज्ञान हस्तांतरण आणि क्षमता निर्माण यासाठी अधिक ठामपणे मागणी करता येईल. गेल्या वर्षी कॉन्फरेन्स ऑफ पार्टिस परिषदेत विकसित देश स्वतःची हवामान बदलासंदर्भात नुकसानभरपाई देण्याच्या जबाबदारीकडे लक्ष न देता भारतासारख्या विकसनशील देशांकडे बोट दाखवत त्यांनीही आपला रोष राष्ट्रांना पैसे पुरवावेत, अशी मागणी करत होते. या निकालातून ऐतिहासिक उत्सर्जन आणि दरडोई उत्सर्जन विचारात घेत देशांवरील जबाबदारी स्पष्ट करण्यात मदत होईल. ■ ■

## कोल्हापूरचे जोतीबा मंदिर




महाराष्ट्राच्या दक्षिणेला कोल्हापूर जिल्हा आहे. मुख्य शहर असलेले कोल्हापूर शहर हे एक प्राचीन शहर आहे. हे शहर पंचगंगा नदीच्या तीरावर आहे, त्याला दक्षिण काशी कोल्हापूर महालक्ष्मी देवीच्या छात्रछायेमध्ये वसले आहे आणि त्याला पुराणामध्ये एक शक्तिपीठ म्हणुन संबोधले जाते.

देशामध्ये कोल्हापूर शहर कोल्हापूरी खास मध्ये प्रसिध्द आहे. ज्योतिबा मंदिर हे महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर जिल्ह्यातील मंदिर आहे. ज्योतिबा हे दैवत शिव व सूर्याचे रूप मानण्यात येते. ज्योतिबा या देवतेला ज्योतिर्लिंग, केदारलिंग, रवळनाथ, सौदागर अशा विविध नावांनीही उल्लेखतात. ज्योतिबा डोंगरावर तीन प्रमुख देवळे आहेत. ती ज्योतिबाचा अवतार असलेल्या केदारलिंग, केदारेश्वर व रामलिंगाची आहेत.

हे मंदिर डोंगरावर असून या डोंगराला ज्योतिबा डोंगर नावाने ओळखले जाते. हे मंदिर कोल्हापूर शहरापासून १४ किमी अंतरावर आहे. ज्योतिबाच्या जन्मदिवशी रविवारी व श्रावणशुद्ध षष्ठीला येथे भाविकांची मोठी गर्दी होते. रत्नासुरावर मिळविलेल्या विजयाप्रीत्यर्थ चैत्री पौर्णिमेस येथे भव्य जत्रा भरते. महाराष्ट्र राज्य व देशाच्या इतर भागांतूनही लाखो भाविक येथे येतात. ज्योतिबाचा डोंगर माणसांनी अक्षरशः फुलून जातो. चैत्री पौर्णिमेच्या दिवशी ज्योतिबाच्या मूर्तीची प्रदक्षिणा देवळाभोवती घातली जाते. नंतर ज्योतिबाच्या चांदीच्या मूर्तीची मिरवणूक पालखीतून वाजत गाजत यमाईदेवीच्या मंदिराकडे निघते. या मिरवणुकीत अनेक सासणकाठया नाचवत नेल्या जातात. ज्योतिबाच्या यात्रेत पन्नासहून अधिक छोटया मोठ्या सासनकाठ्या

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## मराठी भाषा-संस्कृतीवर दोन दिवस मंथन



कुसुमाग्रज विचारमंचाच्या वतीने व मविप्रच्या सहकार्याने शनिवार, ९ ऑगस्टपासून दोनदिवसीय पहिल्या अखिल भारतीय मराठी भाषा-संस्कृती परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. मविप्रच्या रावसाहेब थोरात सभागृहात ही परिषद होणार आहे.

ज्येष्ठ साहित्यिक व भाषा अभ्यासक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी परिषदेच्या अध्यक्षस्थानी राहतील. सकाळी १० वाजता ज्येष्ठ कवी वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होईल. मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे परिषदेचे स्वागताध्यक्ष आहेत. मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुळकर्णी, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

परिषदेत दोन परिसंवाद व मराठी भाषा, संस्कृतीसमोरील विविध आव्हानांची चर्चा करणाऱ्या १९ गटचर्चा होणार आहेत. पहिल्या दिवशी दुपारी ३.३० ते सायंकाळी ६ या वेळेत सहा ठिकाणी सहा विषयांवर गटचर्चा होतील. दुसऱ्या दिवशी सकाळी ९ ते १२ व दुपारी १ ते ३ अशा दोन सत्रांत तेरा ठिकाणी गटचर्चा होतील. निमंत्रितांच्या भाषणानंतर उपस्थितांनाही मते नोंदवता येणार आहेत. परिषदेच्या समारोप सत्रात समन्वयक चर्चांचे सार मांडणार आहेत.

शनिवारी दुपारी १.३० वाजता 'मराठीच्या अवनतीची कारणे' या विषयावर परिसंवाद होईल. डॉ. प्रकाश सपकाळे अध्यक्षस्थानी राहतील. डॉ. प्रकाश परब (मुंबई), श्रीधर लोणी (पुणे) सहभागी होतील. सुभाष सबनीस सूत्रसंचालन करतील. रविवारी, १० ऑगस्टला सकाळी ९ ते १२ या वेळेत'मराठी आधुनिक ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, रोजगार, उन्नती, विकासाच्या संधींची भाषा कधी होणार?' या विषयावर परिसंवाद होईल. त्याच्या अध्यक्षस्थानी विद्यागौरी टिळक राहतील. डॉ. विलास देशपांडे, डॉ. पंडित विद्यासागर, डॉ. अ. पां. देशपांडे, अंजली ढमाळ सहभागी होणार आहेत.

■ ■ ■

## जिल्हा कारागृहातील दोन कर्मचाऱ्यांचा राज्यस्तरीय सन्मान



■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. ८ :
महाराष्ट्र कारागृह विभागातील सन २०२४-२०२५ या वषार्साठी उत्कृष्ट व उल्लेखनीय सेवेसाठी बुलढाणा जिल्हा कारागृहातील दोन कर्मचाऱ्यांना राज्यस्तरीय सन्मान प्राप्त झाला आहे. यामध्ये दिनकर वामनराव मैंद व वैभव पांडुरंग राणे यांना राज्याचे अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक(कारागृह व सुधारसेवा) डॉ. सुहास वारके यांच्या हस्ते पुणे येथे सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

दिनकर वामनराव मैंद हे मागील २२ वर्षांपासून कारागृह विभागात कार्यरत आहेत. त्यांनी बुलढाणा, नागपूर, अमरावती, यवतमाळ, अकोला येथे उत्कृष्ट सेवा बजावली असून सध्या बुलढाणा जिल्हा कारागृहात कार्यरत आहेत.

वैभव राणे हे मागील १७ वर्षांपासून कारागृह विभागात कार्यरत असून बुलढाणा, नाशिक, बीड, धुळे या कारागृहांत उल्लेखनीय सेवा दिली आहे. सध्या तेही बुलढाणा जिल्हा कारागृहात सेवा बजावत आहेत. या सन्मानामुळे बुलढाणा जिल्हा कारागृहाचा गौरव वाढला असून सहकाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.